दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के



## गेवराईत राज ठाकरेंची होणार जाहीर सभा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. खरंतर सहाही मतदार संघात वेगवेगळे चित्र आहे. त्यामुळे कोणाचा पत्ता कधी कट होईल याचाही नेम नाही. परिणामी १९६२ पासून सत्तेत ठाण मांडून बसलेल्या लोकांना जनता, यंदा घरचा रस्ता दाखविण्याच्या तयारीत आहे.त्यामुळे प्रस्थापित घराण्यांचे धाबे दणाणले आहेत.गेवराई मतदार संघात मनसे उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकरांचे काम अतिशय दखलपात्र असल्याने जनता त्यांच्या बाजूने उभा राहिली तर, त्या नक्कीच गेवराईच्या आमदार होतील आणि एक इतिहास घडेल. असे चित्र गेवराई मतदार संघात दिसून येत आहे. त्यांच्या विजयासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची गेवराईत गुरुवार (दि.१४) रोजी सकाळी १० वाजता जाहीर सभा होणार. त्यामुळे मनसे उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकर यांचे पारडे जड झाले आहे.

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

# १९६२ पासूनची सत्ता नेस्तनाबूत करुन टाका

# मयुरीताईंची गर्जना!



मनसे, प्रास्तापितांचे खाते कायमचे करणार बंद

गेवराईत मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकरांचे प्रचंड मोठे कार्य

गेवराईतील प्रत्येक गावात पोहोचली प्रचार यंत्रणा!

## असे बसले सत्तेला चिटकून

| उमेदवार | पक्ष | सन | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| सयाजी त्रिंबक पंडित | काँग्रेस | १९६२ | १३४०८ |
| शाहूराव पवार | सिपीआय | १९६७ | २३३७६ |
| सुंदरराव सोळंके | काँग्रेस | १९७२ | बिनविरोध |
| शिवाजीराव पंडित | काँग्रेस | १९७८ | ३८५३९ |
| माधवराव पवार | काँग्रेस यु | १९८० | ३४७९८ |
| शिवाजीराव पंडित | आयसीपी | १९८५ | ४७८४४ |
| शिवाजीराव पंडित | काँग्रेस | १९९० | ६७७७० |
| बदमराव पंडित | अपक्ष | १९९५ | ७१६६२ |
| बदमराव पंडित | अपक्ष | १९९९ | ६८९३७ |
| अमरसिंह पंडित | भाजप | २००४ | ८०४१४ |
| बदमराव पंडित | राष्ट्रवादी | २००९ | १००८१६ |
| लक्ष्मण पवार | भाजप | २०१४ | १३६३८४ |
| लक्ष्मण पवार | भाजप | २०१९ | ९९६२५ |



## बाळासाहेब मस्केंनी पुण्याई कमविली

| | |
|---|---|
| ५०७३ नागरिकांचे मोफत मोतिबिंदू ऑपरेशन | ३३३७ मनुरांच्या कुटुंबाला कोरोनात आधार दिला |
| १६६५ महिलांना मोफत देवदर्शन घडवून आणले | ३९१५ भाविक-भक्तांना शिर्डी देवदर्शन |



### ...मक्तेदारी हाणून पाडा

गेवराईत आत्तापर्यंत पंडित-पवार या प्रस्थापितांची मक्तेदारी राहिलेली आहे. मात्र त्यांनी केवळ स्वतःच्या संस्था वाढविण्याशिवाय दुसरे काही काम केले नाही. त्यामुळे आजही एमआयडीसी नाही, शासकीय इंजिनिअरिंगसह इतर कॉलेज नाहीत. तसेच, शेतकरी व बेरोजगारी प्रश्न ऐरणीवर आहे. त्यामुळे जनता प्रस्थापितांना कंटाळली असून यावेळी मतदार संघातील सुज्ञ मतदार हा मयुरी मस्के या शेतकऱ्याच्या मुलीला विधानसभेत पाठवेल. हा विश्वास असल्याचे मनसेच्या उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के यांनी माध्यमांशी संवाद साधत असताना व्यक्त केला.

राज्यात सार्वत्रिक विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. निवडणूकपूर्वीच प्रत्येक पक्षात उलथापालथ झाली असल्याने अनेकजण दुखावले गेले आहेत. त्यामुळे सहाजिक निवडणूक रिंगणात अनेक उमेदवार नशीब आजमावत असल्याचे दिसते. निवडणूक लढविणे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक अधिकार आहे. मात्र मतदार संघात, ज्या उमेदवाराचे खरोखरच मोठे काम आहे. आहोत्र लोकांच्या अडी-अडचणी करिता धावून जातात, अशाच उमेदवारांच्या पाठीशी लोक उभा राहतात. त्यामुळे निश्चितच मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकर यांचे कार्य उल्लेखनिय आणि दखलपात्र आहे. म्हणून त्यांचे पारडे जड आहे. गेवराई मतदार संघात, त्यांच्या रुपाने महिला आमदार होण्याचा इतिहास घडणार आहे. हा इतिहास घडविण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची गेवराई शहरातील आठवडी बाजार मैदान येथे गुरुवारी सकाळी जाहीर सभा होणार आहे.

गेवराईचे राजकारण निटपणे समजून घेतले अथवा त्यात डोकावून पाहिले तर चित्र स्पष्ट होते की,१९६२ पासून पंडित-पवार यांच्या घरांभोवती सत्ता असल्याचे दिसते. म्हणून एखादाही सामान्य माणूस आजपर्यंत गेवराईचा आमदार का?होऊ शकलेला नाही, असा प्रश्न पडणे सहाजिक आहे. सत्ता स्वतः कडे ठेवण्यासाठी अतिशय कोणत्याही थराचे राजकारण गेवराई होतांना दिसते. त्याविरुद्ध कोणी कडाडून विरोध आणि पहिले बंड केले असेल तर ते म्हणजे बाळासाहेब मस्के यांनी केले. त्यामुळे आजघडीला बहुतांशी लोकांचा वाढत पाठिंबा मनसे उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकर यांच्या बाजूने दिसतो आहे. मतदार संघातील प्रत्येक गावाशी त्यांची नाळ जोडली गेलेली आहे. सर्वसामान्य जनतेच्या सुखदुःखात मयुरी बाळासाहेब मस्के खेडकर खंबीरपणे उभा राहतात. त्यामुळे यंदा गेवराईत त्यांच्या रुपाने एक नविन चेहरा आमदार नक्कीच होणार आहे.

## बविमो पदाधिकारी उतरले मैदानात!

### रणधुमाळी:योगेश क्षीरसागरांच्या प्रचारार्थ पाठिंबा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी बीड जिल्ह्यातील महायुतीच्या चार जागेवरील उमेदवारांना पाठिंबा दिला आहे. त्यापैकीच एक असलेले डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या विजयासाठी बीडमधील पदाधिकारी, कार्यकर्ते कामाला लागले असून डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले आहे.



बीडमध्ये पत्रकार परिषद घेऊन बहुजन विकास मोर्चाचे प्रमुख बाबुराव पोटभरे यांनी महायुतीच्या चार उमेदवारांना पाठिंबा दिला. डॉ.योगेश हे उच्च शिक्षित, सुसंस्कृत शांत संयमी आणि विकासभिमुख नेतृत्व असून येणाऱ्या काळात बीडच्या विकासासाठी त्यांना निवडून आणण्यासाठी बहुजन विकास मोर्चा बीड मतदार संघात जोमाने काम

## तेच ८५ वर्षांचे अन् मला रिटायर करायला निघालेत

### अजित पवारांची शरद पवारांवर टीका



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
नव्या अन् तरुण उमेदवारांना संधी द्यायला हवी असं शरद पवार म्हणाले होते. बारामती विधानसभा मतदारसंघात आता तरुण नेतृत्त्वाची गरज असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. बारामती विधानसभा मतदारसंघामुळे काका पुतणे सातत्याने चर्चेत असतात. यावरून अजित पवारांनी आज प्रतिक्रिया दिली आहे. ते बोल भिडूने घेतलेल्या मुलाखतीत बोलत होते.३० वर्षे मला साथ दिलीत, ३० वर्षे अजित पवारांना साथ दिलीत आणि

## भाजपाचं पिक वाढलंय म्हणून...

### मतभेद:नितीन गडकरींचा इशारा कुणाकडे?

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
ज्याप्रमाणे पिक जोमाने आल्यानंतर त्यावर रोगराई पसरते. अशावेळी फवारणी करून रोगराईचा नायनाट करावा लागतो. त्याप्रमाणे आता भाजपा पक्षात कार्यकर्त्यांचा भरपूर ओघ येत आहे. त्यात चांगले दाणे आहेत, त्याप्रमाणे रोगराईदेखील आहे. त्याच्यावर फवारणी करायला लागते. ते काम आम्ही करत आहोत, असे विधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे.



मुंबई तक वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये नितीन गडकरी यांनी याबाबत भाष्य केले आहे. कार्यकर्ते घडविताना काय काळजी घेतली पाहीजे, याबाबत बोलत असताना नितीन गडकरी यांनी हे उदाहरण दिले आहे.भारतीय जनता पार्टी ही केडरबेस संघटना असल्याचे नितीन गडकरी मुलाखतीत म्हणाले. नवनवीन लोक पक्षात येत असतात. त्या कार्यकर्त्यांना विचारधारा समजावून सांगणं, प्रशिक्षण देणं, कार्यकर्त्याला घडवणं ही आमची जबाबदारी आहे. हजारो कार्यकर्ते घडविल्यानंतर ते फिल्डवर काम करत असतात.

**ऋणानुबंध** मुंडे बहीण-भावाची उपस्थिती

## परळीत मुंडे प्रतिष्ठानचे स्नेहमिलन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी
भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी शहरात भाजपा कार्यकर्त्यांचा दीपावली स्नेहमिलन सोहळा अतिशय थाटात पार पडला. या सोहळ्यात मुंडे बहीण-भावाने केलेल्या मनमोकळ्या भाषणात नात्यांचा ओलावा दिसून आला. राजकारणातील चिखलात मी 'कमळ' बनुन काम करतेयं असं सांगत आ. पंकजाताई मुंडे यांनी या निवडणूकीत आपल्याला गुलाल उधळायचा आहे, त्यासाठी महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांना जास्तीत जास्त मतांनी विजयी करा असे आवाहन केले तर आम्ही दोघे बहीण-भाऊ एकत्र आहोत, परळीच्या




सर्वांगीण विकासासाठी मिळून काम करु असा शब्द उमेदवार धनंजय मुंडे यांनी कार्यकर्त्यांना दिला.

शहरातील बीकेएस गार्डन येथे पार पडलेल्या या मेळाव्यात व्यासपीठावर भाजपचे ज्येष्ठ नेते बंकटराव कांदे, दत्ताप्पा इटके, जीवराज ढाकणे, शिवाजीराव गुट्टे, श्रीहरी मुंडे, शांतीलाल जैन, डॉ. हरीश्चंद्र वंगे, तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, वैजनाथ जगतकर, अंबाजोगाईचे

### आम्ही एकत्र आलो, याचा आनंद: मुंडे

यावेळी बोलताना धनंजय मुंडे यांनी मागील काही वर्षातील घडलेल्या अनेक आठवणींना उजाळा दिला. लोकसभा निवडणुकीत जे झाले त्या अनुभवातून आता सर्वांनी मिळून काम करावे लागेल. आपल्या सोबतीला राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप एकत्र मिळून काम करत आहे. पूर्वीही अनेक वर्ष आपण एकत्र काम केलेले आहे, त्यामुळे आपले जुळायला फार वेळ लागला नाही. एकत्र असताना प्रत्येक पदाधिकारी-कार्यकर्त्यांना योग्य न्याय व सन्मान दिला जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी पुढे बोलताना स्पष्ट केले. राज्यात महायुती साकारली आणि आम्ही दोघे बहीण भाऊ एकत्र आलो. याचा सर्वांनाच आनंद झाला. आम्हालाही झाला. आज एक आहोत, भविष्यातही असेच एक राहू. आज एकत्र येऊन काम करत असताना परळीत दोन आमदार होतील आणि माझ्या विजयात सिंहाचा वाटा पंकजाताईंचा असेल. निवडणुका पार पडल्यानंतर महायुतीचे राज्यात सरकार येणार आहे. त्या सरकारमध्ये आ.पंकजाताई यांना नक्कीच मोठी संधी मिळणार आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी ताईंच्या मंत्रिपदाचे संकेत दिले.

## राजकिय भूमिका घेताना विश्वासात घेणे महत्वाचे!

### आप्पासाहेब जाधव:कार्यकर्ता बैठक उत्साहात



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी
आपण सर्वांनी मित्र म्हणून एकत्रित पणाने सर्वांच्या विचार विनिमयानेच राजकारणात प्रवेश केला होता, त्या मागचा खरा हेतू हा परिसरातील सामान्य घटकाला न्याय देण्यासाठी ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण असे कार्य करण्याचे ठरले होते, त्यानंतर वेळोवेळी ज्या भूमिका घेतल्या त्या सर्वांना विश्वासात घेऊनच घेतल्या, आपण सर्वजण एका विचाराने चाललो तर आपल्याला अपेक्षित असणारे सर्वांसाठी कार्य करू शकू म्हणून राजकारणात सर्वांना विश्वासात घेऊन काम केले पाहिजे असे मत आप्पासाहेब जाधव यांनी पदाधिकारी व कार्यकर्ते मेळाव्यासंदर्भाने घेतलेल्या बैठकीत व्यक्त केले. माजलगाव तालुक्यातील आप्पासाहेब जाधव मित्र

पान २ वर...

## सरन्यायाधीशांस, सप्रेम

ज्या देशात प्रलंबित वा न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या लाखाच्या घरात आहे त्या देशात एखादा सरन्यायाधीश निवृत्त होताना त्याने दिलेल्या निकालांपेक्षा न दिलेल्या निकालांचीच संख्या अधिक असणार हे स्पष्ट आहे. तरीही सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची निवृत्ती अनेक अर्थांनी– त्यांनी दिलेल्या तसेच न दिलेल्याही– निकालांचा विचार करताना महत्त्वाची ठरते. त्यावर भाष्य करण्याआधी न्या. चंद्रचूड सरन्यायाधीश झाले ती पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. दांडग्या बहुमताने सत्तेवर आलेले सरकार सामाजिक बहुमतवादाचा पुरस्कार करत असताना, लोकशाहीतील तीन स्तंभांपैकी प्रशासनाचा स्तंभ अधिकाधिक बळकट होत असताना, सरकारी आणि घटनात्मक यंत्रणा एकापाठोपाठ एक नांग्या टाकत असताना आणि या सगळ्यांमुळे नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास मोठ्या प्रमाणावर डळमळीत होत असताना न्या. चंद्रचूड सरन्यायाधीश बनले. ज्या समाजात समानता हे तत्त्व नैसर्गिक नाही त्या समाजात सामाजिक, लैंगिक समानतेचा आदर करणारी व्यक्ती सरन्यायाधीश होणे आश्वासक होते. आणि म्हणून आपल्या निवाड्यांतून हा समानतेचा आग्रह ते कितपत राबवू शकतात हे पाहणे कुतूहलाचे ठरणार होते. न्या. चंद्रचूड यांच्याआधी एन व्ही रमण्णा आणि मराठमोळे उदय लळित यांच्या काळात सरन्यायाधीश काय करू शकतात याची चुणूक दिसली होती आणि त्यामुळेही न्या. चंद्रचूड यांच्याबाबतचा आशावाद अधिक प्रबळ होता. भारतीय संस्कृतीइतकीच पाश्चात्त्यांची उच्च सांस्कृतिक मूल्ये अंगी बाणलेली, उदारमतवादाचा आणि विविधतेतील एकतेचा सक्रिय पुरस्कार करणारी व्यक्ती सर्वोच्च न्यायिक अधिकारपदी आरूढ होते ही बाब आशा जागवणारी होती. हा आशावाद किती सार्थ, किती अनाठायी ठरला याचा हिशेब त्यांच्या निवृत्तीसमयी मांडणे आवश्यक ठरते. तसा तो मांडत असताना एक वास्तविकता विसरून चालणार नाही. ते म्हणजे आपल्यासारख्या व्यक्तिकेंद्री देशात एकच एकास नायकपद देऊन त्याने सर्वांच्या सर्व अपेक्षा पूर्ण कराव्यात असे मानणे हा बालिशपणा ठरेल. तो टाळून न्या. चंद्रचूड यांच्या कार्यसिद्धीचा हा हिशेब.न्या. चंद्रचूड यांना सरन्यायाधीशपदी दोन वर्षे मिळाली. ही बाब दुर्मीळ. या आधी इतका कालावधी न्या. सरोश होमी कपाडिया यांना मिळाला. ते २०१० ते २०१२ या काळात सरन्यायाधीश होते. त्या काळात न्या. कपाडिया यांनी स्वत: २७ प्रकरणी निकाल लेखन केले. न्या. चंद्रचूड यांनी लिहिलेल्या न्यायादेशांची संख्या ९२ आहे. चंद्रचूड यांच्याआधीच्या चार सरन्यायाधीशांनी दिलेल्या निकालांची बेरीज जरी केली तरी तीपेक्षा न्या. चंद्रचूड यांच्या निकालांची संख्या अधिक भरेल. 'लोकसत्ता लेक्चर'चे उद्घाटन करताना त्यांनी त्यांच्या काळात सर्वोच्च न्यायालयाकडून झालेल्या एकंदर सुनावण्यांचा तपशील दिला. ती संख्या लाखापेक्षा अधिक आहे. यावरून त्यांच्या 'कार्यव्यसनाधीनतेचा' (वर्कोहोलिक) परिचय होईल. ही झाली केवळ संख्यात्मक बाब. न्या. चंद्रचूड यांनी निकालात काढलेली अनेक प्रकरणे ही अर्थातच घटनात्मक वा घटनेशी संबंधित आहेत. भारतीय घटना हा चंद्रचूड यांच्या जिव्हाळ्याचा विषय. अन्य कोणत्याही प्रकरणांपेक्षा घटनात्मक प्रकरणे हाताळणे हे अधिक जिकिरीचे आणि आव्हानात्मक. कारण या प्रकरणातील निकाल हा एका अर्थी कायदा बनतो आणि पुढील अनेक पिढ्यांसाठी तो परिणामकारक ठरतो. न्या. चंद्रचूड यांनी दिलेले अनेक निकाल त्यामुळे घटनात्मकता, समानता संघराज्यवाद आणि निधर्मिकता या मुद्द्यावर मैलाचा दगड ठरले. महिलांना मंदिरात प्रवेश देणारा, खनिज आणि औद्याोगिक अल्कोहोल उत्पन्नावर राज्यांना अधिकार बहाल करणारा, तुरुंगातील जातप्रथा नष्ट करणारा इत्यादी निकालांचा दाखला देता येईल. हे सर्व विषय तांत्रिक. जनसामान्यांच्या विचारकक्षेबाहेरचे. पण देशात अपेक्षित असलेला 'सहकारी संघराज्यवाद' (कोऑपरेटिव्ह फेडरिलझम) प्रत्यक्षात उतरवण्यासाठी या निकालांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे सर्व निर्णय विस्तारवादी केंद्र सरकारच्या विरोधात जाणारे आहेत, ही बाब विशेष उल्लेखनीय. तथापि 'भक्त'संप्रदाय वगळता सर्वसामान्यांस न्या. चंद्रचूड लक्षात राहतील ते निवडणूक रोख्यांबाबतच्या निर्णयासाठी. निकाल म्हणून त्याचे महत्त्व किती हे नव्याने सांगण्याची गरज नाही. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचा आहे या निकालात सरन्यायाधीशांनी दाखवून दिलेला 'पारदर्शकतेतील समानता' हा निकष. सत्तापदी असलेले आणि नसलेले यांची पारदर्शकता भिन्न असू शकत नाही हे या निकालामागील तत्त्व दूरगामी परिणामकारक ठरेल. 'न्यायिक करुणा' हा न्यायालयीन निकालात क्वचित आढळणारा गुणही न्या. चंद्रचूड यांच्या अनेक निकालांतून दिसतो. एका दलित विद्यार्थ्यास अगदी क्षुल्लक कारणाने आयआयटीत नाकारल्या गेलेल्या प्रवेशाचा मुद्दा वा अपंगांबाबतचे त्यांचे निर्णय यातून या करुणेचे दर्शन घडते. तथापि अयोध्याप्रकरणी निकालाआधी परमेश्वराला साकडे घातले असे म्हणताना वा पंतप्रधानांच्या समवेत कॅमेऱ्यांच्या साक्षीने गणेशारती करतानाही त्यांस या पाश्चात्त्य संस्कृतीने रोखले असते तर अधिक बरे झाले असते. सरन्यायाधीशांसही धर्मपालनाचा अधिकार आहे हे खरे. पण त्याचे असे प्रदर्शन आपल्या अनुकरणीय समाजात कितपत योग्य हा प्रश्न. तसेच सत्ताधीशांस भेटल्यामुळे न्यायिक प्रक्रियेवर काहीही परिणाम होत नाही, हे त्यांचे प्रतिपादन खरे. पण सत्ताधीशांशी संबंधित काही प्रकरणांत नेमकी ही न्यायिक प्रक्रिया कशी काय बुवा लांबते असा प्रश्न सर्वसामान्यांस पडत असल्यास तोही तितकाच खरा. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्याबाबत तो पडला नसता तर त्यांची कारकीर्द अधिक देदीप्यमान ठरली असती. हे नमूद करताना कोणाही मर्त्य मानवातील अपूर्णता त्याच्या पूर्णत्वाच्या ध्यासास मोहक बनवत असते हे सत्य लक्षात घ्यावे लागेल. ही पूर्णत्वाची ओढ प्रामाणिक हवी. न्या. धनंजय चंद्रचूड यांची ती होती हे त्यांचे कडवे टीकाकारही अमान्य करणार नाहीत. न्यायालयीन कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याच्या त्यांच्या निर्णयातून हीच प्रामाणिकता दिसून येते. रसाळ भाषा, उच्च कोटीची बुद्धिमत्ता आणि लोभस तर्कवाद या त्यांच्या गुणांनी क्वचितच कोणा न्यायाधीशास मिळणारी लोकप्रियता त्यांना मिळाली.

# 'स्वस्तिक-एक लक्झरी वेलबीईंग सॅन्क्चुअरी'चे उद्घाटन

## आरोग्य, संपत्ती, प्रेम, आनंद आणि अध्यात्म यांमधून समग्र स्वास्थ्याचा शोध

अनिल चौधरी/ पुणे

पुण्यातील निसर्गरम्य पिकॉक व्हॅलीमध्ये वसलेले 'स्वस्तिक – एक लक्झरी वेलबीईंग सॅन्क्चुअरी' आज ११ नोव्हेंबर २०२४ रोजी अधिकृतपणे सुरू झाले आहे. ५१ एकरांवर पसरलेल्या या आलिशान आरोग्यधामाने एक वेगळा आणि खास अनुभव देण्याचे वचन दिले आहे, ज्याद्वारे आंतरिक शांती मिळवण्याचा आणि समग्र पुनरुत्थानाचा मार्ग खुले होतात. न्याती फाउंडेशनतर्फे डॉ. नितीन न्याती यांनी संकल्पित केलेले हे आरोग्यधाम प्राचीन, विसरलेल्या आरोग्य परंपरा आणि आधुनिक उपचार पद्धती यांचा समन्वय साधून तयार करण्यात आले आहे. इथे येणाऱ्या साधकांना हृदयपूर्वक रचलेले, वैज्ञानिक दृष्टिकोनातून सिद्ध अनुभव मिळतील, ज्यांचा उद्देश जीवनाच्या प्रत्येक अंगाला समृद्ध करणे आहे. पाच परिमाणांची अद्वितीय संकल्पना स्वस्तिक – एक लक्झरी वेलबीईंग सॅन्क्चुअरी आरोग्य, संपत्ती, प्रेम, आनंद आणि अध्यात्म या पाच परिमाणांवर आधारित आहे. हे परिमाण जीवनात स्थिरता आणि उद्देश आणण्यासाठी परस्परांशी जोडलेले आहेत. इथे येणारे अनुभव केवळ शरीराला आराम देणारे नसून, वैयक्तिक शोध आणि आत्मसाक्षात्काराला प्रेरणा देणारे आहेत. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेले प्रत्येक कार्यक्रम आणि अनुभव आयुष्याकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी देतात. उद्घाटनप्रसंगी न्याती ग्रुपचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. नितीन न्याती म्हणाले, स्वस्तिकची आमची कल्पना म्हणजे एक असे ठिकाण निर्माण करणे, जिथे व्यक्ती पारंपरिक आरोग्य संकल्पनांच्या पलीकडे जाऊन स्वतःला पुन्हा शोधू शकतील. वैदिक तत्त्वज्ञान आणि आधुनिक आरोग्य उपचार यांचे संयोजन करून, आम्ही आंतरिक शांती आणि संतुलन प्राप्त करण्याचा मार्ग दाखवतो. आरोग्याच्या पाच परिमाणांची विशेषता आरोग्य परिमाण वैदिक तत्त्वांवर आधारित उपचार पद्धतींच्या माध्यमातून शरीराचे संतुलन पुन्हा प्रस्थापित करते. येथे पृथ्वी, जल, अग्नि, वायू आणि आकाश या घटकांवर आधारित नैसर्गिक उपचार दिले जातात. संपत्ती या परिमाणाला भौतिक संपत्तीपेक्षा आतल्या



समृद्धीचे महत्त्व आहे, तर प्रेमाचा परिमाण मानवी संबंधांना दृढ करतो. आनंद परिमाण आपल्याला जीवनाच्या प्रत्येक क्षणात कृतज्ञता आणि समाधान शोधायला शिकवतो, तर अध्यात्मिकता परिमाण मन आणि आत्म्याला जागरूक बनवण्याचा मार्ग दाखवते. विविध 'विहारां'मधून अनोखे अनुभव स्वस्तिकचे आरोग्यधाम विविध 'विहारां'मध्ये विभागलेले आहे, जिथे प्रत्येक विहार आरोग्य आणि समृद्धीला प्रोत्साहन देते. 'आयु विहार' आयुर्वेद, निसर्गोपचार आणि पर्यायी उपचार पद्धतींमधून संपूर्ण उपचार देतो. येथे थेरपी रूम्स, विश्रांती क्षेत्रे, सूर्य कुंड (गरम पाण्याचा तलाव) आणि लवणम (सॉल्ट केव्ह) यांसारख्या खास सुविधा आहेत. 'सुख विहार'मध्ये ६४ लक्झरी सूट्स आणि व्हिलाज आहेत, जिथे साधकांना आत्मचिंतनासाठी आवश्यक ते शांत वातावरण मिळते. 'आनंद विहार' खडकवासला तलावाच्या सुंदर परिसरात वसलेले आहे आणि येथे निनादिका (ध्वनी उपचार), स्मितम (पूलसाइड लाउंज) आणि रस (संपूर्ण जगभरातील आरोग्यदायी खाद्यपदार्थ देणारे रेस्टॉरंट) यांचा समावेश आहे. 'ध्यान विहार' अध्यात्मिक प्रबोधनासाठी समर्पित असून, ११,००० चौरस फूटांचे ध्यान मंदिर आणि नक्षत्र वन (राशिचक्र बाग) इथे आहे. 'उत्सव विहार' हे योग, संगीत, नृत्य आणि विविध कलांद्वारे व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देते. यामध्ये खुले रंगमंच, रंगमंडल, आणि पाण्याचे खेळते प्रवाह, मऊ गोटे आणि खड्यांनी बनवलेला अनंत मंडल (रिफ्लेक्सोलॉजी पथ) आहे, ज्यामुळे पायातील महत्त्वाच्या बिंदूंना आराम मिळतो. वास्तुकलेची भूमिकाही आरोग्यासाठी महत्त्वाची स्वस्तिकचे मुख्य वास्तुशिल्पकार श्री. मनीष बनकर म्हणाले, वास्तुकला ही फक्त इमारती बांधण्याची कला नसून, ती एक शक्तिशाली उपचारात्मक साधन आहे. वास्तुशास्त्राच्या प्राचीन तत्त्वांना आधुनिक डिझाईनसोबत एकत्र करून, आम्ही एक असे वातावरण तयार केले आहे जे मानवाला निसर्गाशी जोडते आणि त्याला मानसिक आणि आध्यात्मिक आराम देते. व्यक्तिनिष्ठ कार्यक्रमांची संपूर्ण रचना स्वस्तिक – एक लक्झरी वेलबीईंग सॅन्क्चुअरी साधकांच्या गरजेनुसार आरोग्य यात्रा तयार करते. तीन रात्रींचे डिस्कव्हर प्रोग्राम परिचयात्मक अनुभव देतात, तर सात रात्रींपेक्षा जास्त काळ टिकणारे हील प्रोग्राम्स डीप थेरपीचा अनुभव देतात, जसे की होलिस्टिक डिटॉक्स आणि पंचकर्म. दीर्घकालीन आरोग्यासाठी एम्पॉवर प्रोग्राम्स, जसे ग्रेसफुल एजिंग आणि एसेंस ऑफ वुमनहूड, जीवनाच्या संक्रमण काळात समर्थन देतात. वर्षभर चालणारे सिग्नेचर प्रोग्राम्स, जसे की एसिंग अडोलसन्स आणि रूट्स अँड रिलेशन्स, कुटुंबीयांना बांधून ठेवतात आणि वैयक्तिक वाढीला प्रेरित करतात. स्वस्तिक – एक लक्झरी वेलबीईंग सॅन्क्चुअरी जीवनातील उच्चतम संभाव्यता उलगडण्यासाठी तयार आहे, जिथे शारीरिक आणि मानसिक उपचारांना एकत्रित करून एक नवीन आयुष्याची अनुभूती मिळते. इथे प्रत्येक अनुभव, आहार, उपचार आणि वैयक्तिक संवाद साधकांच्या एकूण आरोग्याला समृद्ध करतो. स्वस्तिकचे दरवाजे आता उघडले असून, जगभरातील साधकांना आनंद, उद्देश आणि शांततेचा अनुभव घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. स्वस्तिक बद्दल स्वस्तिक – ए लग्जरी वेलबीइंग सँक्चुअरी, पुण्याच्या शांत पिकॉक व्हॅलीमध्ये वसलेली, लक्झरी आणि समग्र आरोग्याचा संगम असलेला एक परिवर्तनशील अनुभव प्रदान करते. डॉ. नितीन न्याती यांच्या न्याती फाउंडेशनच्या अंतर्गत स्थापन केलेले हे सँक्चुअरी हवाई आणि रस्त्याने सहज उपलब्ध आहे. स्वस्तिक पाच मूलभूत आयामांवर भर देते: आरोग्य, संपत्ती, प्रेम, आनंद, आणि अध्यात्म. काळजीपूर्वक तयार केलेले कार्यक्रम पाहुण्यांना आत्मशोध आणि नवचैतन्याच्या प्रवासात मार्गदर्शन करतात. प्रत्येक अनुभव, आरोग्यदायी आहारापासून खास उपचारांपर्यंत आणि ध्यानप्रवृत्तीपर्यंत, जीवन समृद्ध करण्यासाठी सावधानतेने रचला गेला आहे. प्राचीन ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांच्या सुसंवादी मिश्रणाने, स्वस्तिक भारतातील प्रमुख वेलबीइंग रिट्रीट होण्याचे उद्दिष्ट ठेवते, ज्यामध्ये प्रवास आनंददायी आणि परिवर्तनकारी असतो. पुनरुज्जीवन, आध्यात्मिक विकास किंवा अंतर्गत शांतता शोधत असाल, तर स्वस्तिक आपल्याला अशा जगात घेऊन जाते, जिथे लक्झरी आणि जीवनाचे उद्दिष्ट एकमेकांशी जोडलेले आहेत.

## पान एक वरून

**बविमो पदाधिकारी उतरले**

करणार असल्याचे बाबुराव पोटभरे यांनी सांगितले. त्यांच्या पाठिंब्यानंतर जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाणे, युवक जिल्हाध्यक्ष जयसिंग तांगडे, विनोद शिंदे, जय तांगडे, लखन हजारे, मोरे श्रीहरी, बाबासाहेब वाघमारे, प्रदीप पटेकर, बिभीषण डोंगरे, विलास जावळे, शांतीदूत घोडके, अशोक हुबरे यांच्यासह बहुजन विकास मोर्चाचे पदाधिकारी कामाला लागले आहेत.

**तेच ८५ वर्षांचे अन् मला**

पुढच्या ३० वर्षांची व्यवस्था करण्याची गरज आहे, असं शरद पवार म्हणाले होते. यावर अजित पवार म्हणाले, त्यांची ३० वर्ष झाली. आता ते म्हणतात की मी कोणत्याही निवडणुकीत उभा राहणार नाही. ते माझ्यापेक्षा २० वर्षांनी मोठे आहेत. ते ८५ वर्षांचे आहेत आणि ते मला आता रिटायर करायला निघालेत. ते मात्र ८५ वर्षांपर्यंत काम करू शकतात, हा कोणता न्याय?, असं अजित पवार म्हणाले.ही महायुती आहे. महाविकास आघाडी, महायुतीमध्ये अनेक राजकीय पक्ष घटकपक्ष म्हणून येतात. त्यावेळी तुम्हाला दुजाभाव करून चालत नाही. सदाभाऊ खोतांनी केलेलं वक्तव्य अतिशय निंदनीय आहे. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही, परंपरा नाही. मतभेद असले तरीही कंबरेखालचे वार करत नाहीत. व्यक्तीच्या आजारावरून टीका टिप्पणी करत नाहीत. राजकारण दोन दिवसांचं असतं, त्यातून आपण काय मिळवतो? असं अजित पवार म्हणाले.शरद पवारांनी काही जुन्या नव्यांना घेऊन काम केलं आहे. मीही नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. असं करावंच लागतं. कारण नवे कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत. त्यांच्यात स्पार्क आहेत की नाही हेही पाहावं लागतं, असं अजित पवार म्हणाले.

**भाजपाचं पिक वाढलंय**

पण एखादा कार्यकर्ता असे काही बोलतो की हजार कार्यकर्त्यांच्या कामावर पाणी सोडलं जातं. त्यामुळे कार्यकर्त्याला घडविण्याची प्रक्रिया आमच्या पक्षात नित्य सुरू असते. देशात आज विचारभिन्नता अडचण नाही तर विचारशून्यता ही अडचण आहे. राजकारणात आज जे लोक काम करतात, त्यांना स्वतःविषयी चिंता असते. माझे काय होईल? मला तिकीट मिळणार का? मला सत्ता द्या, हा मी वरचढ होऊ लागला आहे. समाजाची चिंता असलेला कार्यकर्ता पक्षाची ताकद आहे, अशी भावना नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.महाराष्ट्राच्या राजकारणात जात हा मुद्दा मागे पडत चालला आहे. जातीच्या आधारावर जर निवडणुकीचे परिणाम पाहायला गेले तर ते निकालानंतर चुकल्याचे दिसते. जात आता समाजात उरली नसून ती पुढाऱ्यांच्या मनात उरली आहे. अनेक ठिकाणी असे पुढारी आहेत की, ज्यांच्या जातीचे मतदार त्या त्या मतदारसंघात फारसे नसतात. तरीही ते त्याठिकाणी जिंकून येत असतात. काही निवडक पुढारी जातीचे राजकारण करत असतात. मात्र लोकांचा कल आता विकासाकडे आहे, असे नितीन गडकरी म्हणाले.

**परळीत मुंडे प्रतिष्ठानचे**

शामराव आपेट, गणेश कराड, जीवनराव किर्दंत, अविनाश मोरे आदींसह मतदारसंघातील सर्व बुथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व सरपंच, चेअरमन व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. प्रसंगी पुढे बोलताना आ.पंकजाताई म्हणाल्या की, 'मी माझ्या आयुष्यात कधीच कोणतेही वाईट काम केले नाही. आमदार झाले, मंत्री झाले आणि पालकमंत्री झाले. या माध्यमातून जिल्ह्यासाठी व परळीसाठी अभूतपूर्व असे काम केले. आयुष्यात सर्व काही मिळाले आहे. आता लोकनेते मुंडे साहेबांची आणि पूर्वजांच्या पुण्याईची शिदोरी गोरगरीब, सर्वसामान्य,गरजू लोकांसाठी खर्च करायची आहे. समाजासाठी समर्पित भावनेने काम करायचे हा निश्चय घेऊन आम्ही काम करत आहोत. जीवनात काही चांगले केले असेल तर ते म्हणजे गोपीनाथगड उभारण्याच काम मी केलं आणि कधीच कोणत्याही वाईट कामात सहभागी झाले नाही याचा मला अभिमान आहे. लोकसभेची निवडणुक लढवली, या निवडणुकीत माझे बंधू धनंजय मुंडे माझ्यासोबत राहिले, त्यांनी माझा प्रचार केला याचा मला मनस्वी आनंद झाला. त्यांचे नेते, कार्यकर्ते देखील माझ्या प्रचारात सहभागी झाले. सर्वांनी सांगितल की, पंकजाताई आम्ही तुमच्यावर नाराज नाहीत, तुम्ही कधीच आमच्या विरोधात आमचे वाईट करण्याच्या हेतूने कोणतीही कृती केलेली नाही. याच कारण म्हणजे राजकारणाच्या चिखलात 'कमळ' बनून काम करायच' ही शिकवण मला मुंडे साहेबांनी दिल्याने हे शक्य झालं असे त्या यावेळी म्हणाल्या.

**राजकिय भूमिका घेताना**

मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या मेळाव्याचे आयोजन दिनांक १३ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे, तरी या मेळाव्याच्या आयोजनाचा आढावा बैठक आज घेण्यात आली, यावेळी आप्पासाहेब जाधव मित्र मंडळाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती, उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना आप्पासाहेब जाधव यांनी सामाजिक व राजकीय काम करत असताना आपल्याला साथ देणाऱ्या प्रत्येकाला विश्वासात घेण्याचा प्रयत्न आपण करत असतो आणि त्यामधून सर्वानुमते विचार करत आपण पुढे जात आहोत, याच पद्धतीने भविष्यातही सर्वसमावेशक विचार करून आपल्या भूमिका ठरवण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे असे म्हणाले. याप्रसंगी अतुल ऊगले,संभाजी पास्टे,महेश थेटे,तिर्थराज पांचाळ, भागवत रिंगणे, बळीराम बादाडे,माऊली जाधव,बालाजी लोखंडे, बाळु खिस्ते, राज जाधव, रुपेश घोडके,कामराज डाके,कचरू बडेकर,शिवाजी चव्हाण, अशोक आतकरे,नारायण तौर,महादेव वराळे, प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान सहा वरून

**महावितरणचा भोंगळ**

निर्माण होत आहे. कडा येथील ट्रान्सफॉर्मर बंद पडून दोन महिने झाले. तरी अद्याप नवीन ट्रान्सफॉर्मर देखील बसवण्यात आलेला नाही . त्यामुळे दसरा दिवाळी मध्ये देखील वीज ग्राहकांना विजेच्या लपंडावाचा सामना करावा लागला. आता शेतीसाठी विजेची मागणी वाढू लागली आहे. त्यामुळे कडा येथे तातडीने ट्रान्सफॉर्मर बसवण्याची वीज ग्राहकांनी मागणी केली आहे.

**सामाजिक बंधिलकीतून**

अध्यक्ष संदीप इंगळे, अनिल लोखंडे,अशोक ढगे,ज्ञानेश्वर गाडेकर,सौ.उर्मिला इंगळे, सौ.रुपाली लोखंडे,सौ.मीना गाडेकर, सौ.पद्मा शिंदे,गणेश गायकवाड,अमोल निकम,गणेश कापरे, विष्णू पंडित,शेख गुलाब,भास्कर श्रीखंडे,यासिन बेग,मयुर शिंदे आदींनी परिश्रम घेतले. रक्तदानाच महत्व जाणून सिल्लोड–सोयगाव विधानसभा निवडणुकीत प्रजा सुराज्य पक्षाचा पुरस्कृत अपक्ष उमेदवार शरद आण्णा तिगोटे यांनी रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवून रक्तदान केले. तर वंचित बहुजन आघाडीचे सिल्लोड–सोयगाव मतदार संघाचे उमेदवार बनेखा पठाण, अंकुश पगारे यांनी शिबीरास्थळी भेट दिली.या वेळी संस्थेचे अध्यक्ष संदीप इंगळे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.

**सासरच्या लोकांनी जगणे**

तुला आमच्या घरातुन हाकलून देवुत अशा धमक्या देत होत्या. पती भागवत व सासु कमलबाई हे दोघेजन मला सतत उपाशीपोटी ठेवुन घरातील सर्व कामे माझ्या एकटीकडून करून घेवुन शारिरीक व मानसिक त्रास देवुन जाच जुलुम करु लागले. त्यानंतर माझे चुलत भाऊ क्रष्णा बालाजी गोरमाळी रा. बनसारोळा ता. केज याला मी वरील घडलेला प्रकार सांगीतला तेव्हा त्याने माझे पती यांना त्याचे कडील एक लाख रुपये त्याचे कडील कर्ज फेडण्यासाठी घरी आणुन दिले होते. त्यानंतर दिवाळीच्या सनासाठी मी माहेरी गेल्यानंतर दिनांक ०६/११/२०२४ रोजी पहाटे ०५.३०वाजनेच्या सुमारास मी व माझा भाउ असे माझे दोन्ही मुलांसह माझे पतीच्या घरी वसंत कॉलेज जवळ केज येथे आले असता माझया पतीने दरवाजा उघडला नाही व तु कोणासोबत आली असे काही पण खाण आरोप करून मला हकलुन दिले म्हणुन माझी भागवत रामभाउ राउत व कमलबाई रामभाउ राउत रा. कानडीमाळी ता. केज जि.बीड, महानंदा अनुरथ गोरे रा. बनसारोळा ता. केज, शिवनंदा केरबा राउत रा. कानडीमाळी ता. केज यांचे विरुध्द तक्रार आहे. हि तक्रार दिली ती संगणकावर टंकलीखीत केली ती मला वाचुन पाहिली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.असे फिर्यादी महीलेने म्हटले आहे तरी पुढील कार्यवाही केज पोलीस स्टेशन करीत आहे.

**अनिलदादा जगताप**

चित्र स्पष्ट दिसत आहे. म्हणून समाजाशी एकनिष्ठ राहणा–या नेतृत्वास विधानसभा निवडणुकीत जाहीर पाठिंबा देऊन आम्हाला अनिलदादा यांची ताकद वाढवायची आहे आणि अनिलदादांना विक्रमी मतांनी विजयी करायचे आहे आणि त्यासाठी आम्ही एकजुटीने जीवाचे रान करू अशी भावना भिमराव कोकाटे पाटील संस्थापक अध्यक्ष मराठा संग्राम पक्ष महाराष्ट्र राज्य यांनी व्यक्त केली. अनिलदादा जगताप यांनी भिमराव कोकाटे पाटील यांचे स्वागत करत आभार व्यक्त केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांच्यासोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

**सर्वांगीण विकासासाठी**

मोठ्या संख्येने उपस्थित होते.परळी विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी आता बदल हवाय जनसामान्यातील सामान्य व्यक्तिमत्व असलेले महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना येणाऱ्या २० तारखेला प्रचंड मतांनी माणूस धारी तुतारी या चिन्हा समोरील बटन दाबून विजयी करावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे चंद्र पवार पक्षाचे युवा नेते ॲड. माधव आप्पा जाधव यांनी मतदारांना या प्रसंगी केले.

**स्नेहसदन चर्च येथे यात्रा**

सनडो फा अल्विन आदी उपस्थित होते स्नेहसदन चर्चचे प्रमुख धर्मगुरु फा राजु शेळके व सहाय्यक धर्मगुरु फा संपत यांनी यांनी उपस्थित भाविकाचे यात्रा महोत्सवाला निमित्ताने स्वागत करुन उस्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल धन्यवाद दिले यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी स्नेहसदन चर्चचे परिश कौन्सिल उपाध्यक्ष डॉ रमेश ब्राह्मणे सचिव प्रकाश भोसले यांच्या सह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**संवेदनशील गावांमध्ये**

समोर पथसंचलनाला सुरुवात केली व गावामध्ये फेरी मारून हे पथसंचलन पूर्ण करण्यात आले. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे पथसंचालन करण्यात आले. निवडणुकीमध्ये मतदानच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडावी यासाठी सशस्त्र पथसंचलन करण्यात आले. केरळ राज्यातील राखीव दलाच्या जवानांनी सशस्त्रासह गावातून पथ संचालन केले. यावेळी गेवराई पोलीस ठाण्यातील पोलीस दलाचाही यामध्ये समावेश होता. या पथसंचलनात पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, सपोनि संतोष जंजाळ, राजाभाऊ गर्जे, देवडे, रामनाथ उगलमुगले सह पोलीस अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते. पथसंचलनात केरळ राज्य राखीव दलाचे एक अधिकारी ५० जवान यांच्यासह गेवराई पोलीसांचा समावेश होता. कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीच्या काळात कोणतेही गालबोट लागू नये, यासाठीची ही पथसंचलनाची तयारी केली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई-मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# घोटगेवाडी येथे आढळला दुर्मिळ उडता सोनसर्प

### सापाला सर्पमित्र गवस यांनी सोडले नैसर्गिक अधिवासात

**सावंतवाडी** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात घोटगेवाडी येथे दुर्मिळ असलेला उडता सोनसर्प आढळून आला आहे. या गावात पुन्हा एकदा सोनसर्प आढळून आल्याने परिपूर्ण जैवविविधतेने हा भूभाग व्यापला आहे असे पर्यावरण प्रेमींनी म्हटले आहे. घोटगेवाडी येथील शेतकरी सखाराम नारायण सुतार यांच्या घरालगत शुक्रवारी सायंकाळी हा साप दिसून आला. नेहमी



आढळणाऱ्या प्रजातींव्यतिरिक्त नवीन प्रजातीचा साप असल्याचे उघडकीस आले. या सापाला सर्पमित्र लाडू गवस यांनी पकडून नैसर्गिक अधिवासात सोडले. अशा प्रकारचा साप गतवर्षी जूनमध्ये तेथील दत्त मंदिराच्या परिसरातील पिंपळाच्या झाडाखाली आढळून आला होता. या सापाला शेलाटी तथा उडता सोनसर्प तथा इंग्रजीत ऑरनेट फ्लाईंग स्नेक (शास्त्रीय नाव - क्रिसोपेलिया ओर्नाटा) म्हणतात.

# बालमृत्यू टाळण्यासाठी जि.प.तर्फे न्यूमोनियाविरोधात विशेष मोहीम

देशोन्नती वृत्तसंकलन

**नाशिक** : जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील पाच वर्षे वयाखालील मुलांमधील न्यूमोनियाचे प्रमाण शून्यावर आणून बालमृत्यू टाळण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने १२ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत सोशल अवरनेस ॲण्ड ॲक्शन टू न्यूट्रलाइज न्यूमोनिया (सांस) ही मोहीम न्यूमोनिया विरोधात जनजागृतीसाठी राबविण्यात येणार आहे.

आदिवासीबहुल त्र्यंबकेश्वर,

### जिल्ह्यात वर्षभरात २३८ बालकांचा मृत्यू



सुरगाणा आणि पेठ येथे बालमृत्यूचे प्रमाण अधिक आहे. जिल्ह्यात वर्षभरात २३८ बालकांचा मृत्यू झाला. बालमृत्यूत पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वरमध्ये घट तर, बागलाण, इगतपुरी, दिंडोरीत वाढ झाली आहे.

# संत बाळू मामांच्या पालखीला उत्साहात सुरुवात

### सोहळा लिंबागणेश मुक्कामी

देशोन्नती वृत्तसंकलन

**बीडः** बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे श्री संत सदगुरू बाळू मामांच्या मेंढी माऊली आणि पालखी सोहळ्याचे मुळुकवाडी येथील मुक्काम उरकुन लिंबागणेश येथे पालखी सोहळ्याचे ढोल ताशांच्या गजरात भाविकांनी व महिला भगिनींनी सडासमार्जन करून रांगोळी काढत मोठ्या उत्साहात स्वागत केले. पालखी लिंबागणेश मुक्कामी विसावली आहे. याबाबत माहिती देताना श्री संत बाळूमामा पालखी सोहळ्याचे प्रमुख गुरव कारभारी आप्पा माळी म्हणाले की संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एकूण १९ पालख्या आहेत. त्यात जवळपास ३ लाख मेंढी असुन लिंबागणेश मुक्कामी पालखी बग्गा नंबर ९ असुन यामध्ये ३००० मेंढी आहेत.

# मुंब्रा परिसरात आगीच्या दोन घटना

**कळवाः** मुंब्र्यात एकाच दिवसात दोन आगीच्या घटना घडल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे आलेल्या माहितीनुसार, मुंब्रा रेल्वे फास्ट ट्रॅकजवळ अमरज्योत ही चार मजली इमारत आहे. या इमारतीच्या तळ मजल्यावरील एका घरातील देवघराला आग लागली होती. घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान एक, फायर वाहन आणि एक रेस्क्यु वाहनासह उपस्थित होते. आग पूर्णपणे विझवण्यात अग्निशमन

### घटनेत कोणालाही दुखापत नाही



दलाच्या जवानांना रात्री साडेबाराच्या सुमारास यश आले. घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. दुसऱ्या घटनेत कौसा येथील बोसान हॉटेलजवळील फरिदा अपार्टमेंटच्या मीटर बॉक्सला आग लागली. यात काही मीटर जळून गेल्याची घटना घडली आहे.

# ट्रक-खासगी बस अपघातात 15 प्रवासी जखमी

**मुंबईः** मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर खाजगी बसचा भीषण अपघात झाला आहे. खोपोलीजवळ शनिवारी पहाटे ४ वाजता ही घटना घडली आहे. कोल्हापूरकडून मुंबईकडे जाताना असलेल्या मार्गावर हा अपघात झाला. मुंबई लेनवर उभ्या असणाऱ्या ट्रकवर खासगी बस आदळली. या अपघातामध्ये बसमधील १५ प्रवासी जखमी झाले

### ८ जणांची प्रकृती गंभीर

आहेत. त्यापैकी ८ जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर बोरघाट पोलीस, खोपोली पोलीस, आय आर बी यंत्रणा, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी घटनास्थळी दाखल झाल्या.

# डीजीपी संजय कुमार वर्मा यांच्या सशर्त नियुक्तीबाबत त्वरित हस्तक्षेप करा!

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचे निवडणूक आयोगाला पत्र



वृत्तसंस्था

**मुंबईः** महाराष्ट्र सरकारने संजय कुमार वर्मा यांची पोलिस महासंचालक म्हणून सशर्त नियुक्ती करण्याची कृती ही घटनात्मक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि स्थापित प्रशासकीय तत्त्वे यांचे उघड उघड उल्लंघन करणारी आहे. यामुळे पोलिस महासंचालकांना निवडणुकीच्या काळात तटस्थ व निष्पक्षपणे काम करण्यात अडचणींचा सामना करावा लागले म्हणून निवडणूक आयोगाने आपल्या अधिकाऱ्यांचा वापर करून संजय वर्मा यांच्या तात्पुरत्या नियुक्तीच्या आदेशावर त्वरीत निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

### महाराष्ट्र सरकारने केले उल्लंघन

असा एकतर्फी फेरफार हा निवडणूक आयोगाच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे. सर्वोच्च न्यायालयाने प्रकाशसिंह आणि इतर विरुद्ध भारत आणि इतर संघ प्रकरणी ऐतिहासिक निकाल देताना डीजीपींच्या नियुक्तीसाठी मार्गदर्शक तत्वे, योग्यता आणि राजकीय प्रभावापासून संरक्षण यासंबंधाचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत, त्याचेही महाराष्ट्र सरकारने उल्लंघन केलेले आहे.

निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात नाना पटोले म्हणाले की, निवडणूक आयोगाने ५ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्यघटनेच्या कलम ३२४ अंतर्गत घटनात्मक अधिकाराचा वापर करत संजय कुमार वर्मा यांची महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालक पदी कोणत्याही अटींशिवाय नियुक्तीचे स्पष्ट आदेश दिले आहेत. निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोलिस दलाची निष्पक्ष व तटस्थ भूमिका असावी यासाठी ही नियुक्ती केली होती. परंतु निवडणूक आयोगाच्या या निर्देशाचे उल्लंघन करत महाराष्ट्र सरकारने संजय वर्मा यांची नियुक्ती आचार संहितेपर्यंतच करणारा आदेश काढला.

# आचारसंहिता भरारी पथकावरच खंडणीचा गुन्हा दाखल!

देशोन्नती वृत्तसंकलन

**उल्हासनगर** : साडेसात लाखांच्या रोख रक्कमेचा तपशिल असताना धाक दाखवून एका फुल उत्पादक व्यापाऱ्याकडून ८५ हजार रुपये उकळणाऱ्या उल्हासनगर महापालिकेच्या आचारसंहिता भरारी पथकातील पाच जणांवर खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पालिकेच्या तिघा कर्मचाऱ्यांसह दोन पोलिसांचा समावेश असून तेरा दिवसांनी हे प्रकरण समोर आले आहे.

कल्याणवरून फुल उत्पादक व्यापारी बबन आमले त्यांचा मित्र नितीन शिंदेसह २८ ऑक्टोबर रोजी पहाटे आहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फुल उत्पादनाच्या विक्रीचे पैसे देण्यासाठी जात होते. म्हारळ चौकीजवळ आचारसंहिता भरारी पथक क्रमांक सहाच्या टीमने त्यांची गाडी अडवली. तपासणी दरम्यान त्यांच्याकडे ७ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम




सापडली. पथकप्रमुखांनी आमले आणि शिंदे यांना गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवली. पण आमले यांनी पावत्या दाखवून पैसे वैध असल्याचे स्पष्ट केले. तरीही त्यांच्याकडून ८५ हजार रुपये उकळण्यात आले. जवळपास तेरा दिवसांनंतर या प्रकरणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे याबाबत विचारणा करण्यात आली. त्यानंतर उल्हासनगर पालिकेचे सहायक आयुक्त सुनील लोंढे यांच्या फिर्यादीवरून पाच जणांवर खंडणीचा गुन्हा दाखल झाला.

# सुनील टिंगरेंनी शरद पवारांना पाठवलेली नोटीस सुळेंनी आणली समोर

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणेः** पोर्शे कार अपघात प्रकरणी आमदार सुनील टिंगरे यांनी शरद पवार यांनी नोटीस पाठवली होती, असा मोठा गौप्यस्फोट सुप्रिया सुळे यांनी एका सभेत केला होता. यानंतर मी शदर पवारांना कोणतीही नोटीस पाठवले नसल्याचे सुनील टिंगरे यांनी सांगितले होते. त्यानंतर सुप्रिया सुळे यांनी आज सुनिल टिंगरेंनी शरद पवारांना पाठवलेली नोटीस पत्रकार परिषदेत सर्वांसमोर दाखवली. राजकारणात सध्या सत्तेत असलेल्या लोकांकडून धमक्या दिल्या जात असल्याचा आरोपही सुप्रिया सुळे यांनी यावेळी केला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, सुनील टिंगरे यांनी सांगितले की मी कोणतीही नोटीस पाठवली नाही. यामुळे या नोटीसची कॉपी मी आणली आहे. यामध्ये शरदचंद्र पवार यांचे नाव आहे. त्यांच्या नावानीशी ही नोटीस १५ ऑक्टोबर रोजी पाठवण्यात आली आहे. त्या पक्षाचे प्रमुख शरद पवार यांना नोटीस पाठवली आहे. त्यात पोर्श कार अपघात प्रकरणात बिनशर्त माफी मागण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आता आम्ही कशासाठी माफी मागावी. आमदार टिंगरे पोर्शे कार अपघात प्रकरणात पोलिस ठाण्यात गेले होते, हे पोलिसांनी मान्य केले आहे.

सुप्रिया सुळे यांनी धनंजय महाडिक यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय महाडीक यांची केलेल्या विधानाचा मी निषेध करते. महाराष्ट्रातील महिलांना धमकी देण्याची हिंमत होतेच कशी? महिलांना अशा प्रकारच्या धमक्या देणे खपवून घेणार नाही. कोणतीही महिला कोणत्याही पक्षाच्या सभेला किंवा प्रचाराला जाऊ शकते. संविधानाने त्यांना तो अधिकार दिला आहे. भाजप स्वतःच्या खिशातून पैसे देत नाही. जर राजकीय सुडापोटी त्या महिलांचा कोणताही शासकीय निधी बंद केला, तर गाठ आमच्याशी आहे, असा इशाराही सुप्रिया सुळे यांनी भाजपला दिला आहे. धनंजय महाडीक यांनी केलेल्या वक्तव्याप्रकरणी महिला आयोगाने देखील दखल घ्यावी, अशी मागणी सुळे यांनी केली आहे.

# महाडिक त्यांच्यावर संगतीचा परिणाम दिसतोय

**नवी मुंबई** : सध्या महायुती असो वा महाविकास आघाडी निवडणूक प्रचाराचा मुख्य मुद्दा ठलाडकी बहीण' हाच आहे. शनिवारी कोल्हापूर येथील आयोजित एका सभेत बोलताना भाजपाचे खासदार धनंजय महाडिक यांनी म्हटले की, ठलाडकी बहिणी योजनेचे १५०० रुपये घेणाऱ्या महिला काँग्रेसच्या प्रचारफेऱ्यांमध्ये दिसल्या तर त्यांचे फोटो काढून घ्या, आम्ही त्यांची

### सुप्रिया सुळेंची भाजपावर टीका

व्यवस्था करतो.' वादग्रस्त वक्तव्यानंतर धनंजय महाडिक यांनी माफी मागितली आहे. मात्र यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांना प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या की, महाराष्ट्रातील महिला कोणतीही धमकी खपवून घेणार नाही.



आज पत्रकार परिषदेत धनंजय महाडिक यांच्यासंदर्भात प्रश्न विचारला असता सुप्रिया सुळे म्हणाल्या की, धनंजय महाडिक यांचा व्हिडीओ मी पाहिलेला आहे. महाविकास आघाडी अशा कुठल्याही धमक्यांचा जाहीर निषेध करते. धनंजय महाडिक आणि आम्ही अनेक वर्षे एकत्र काम केले आहे. त्यामुळे त्यांच्या या वक्तव्याने मला आश्चर्य वाटले. नेहमी असे म्हणतात की, आपल्या मुलांची संगत चांगल्या लोकांसोबत असली पाहिजे. कारण तेच संस्कार त्यांच्यावर होतात. गेली अनेक वर्षे धनंजय महाडिक आमच्यासोबत सुसंस्कृत होते. पण आता त्यांच्यावर संगतीचा परिणाम झालेला दिसत आहे. कारण ज्या पद्धतीने ते महिलांना धमकावत होते, ते चुकीचे आहे. मी जाहीरपणे धनंजय महाडिक यांच्या त्या वक्तव्याचा निषेध करते.या राज्यामध्ये, त्यातूनही शाहू महाराजांच्या कोल्हापूरमध्ये आज महिलांना धमकावले जात आहे.


# विक्रोळीत कॅश व्हॅनमध्ये सापडल्या चांदीच्या विटा

### विटांची किंमत 60 कोटींच्या घरात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई** : दोन दिवसांपूर्वीच दक्षिण मुंबईतील भुलेश्वर भागातील शिवडी येथून पोलिसांनी २.३ कोटी रुपयांची रोकड आणि एक कोटी रुपयांचे सोने जप्त करण्यात आले होते. यानंतर आता मुंबईतील विक्रोळीत एका कॅश व्हॅनमध्ये साडेसहा टन चांदीच्या विटा सापडल्या आहेत. याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. तेव्हापासून निवडणूक आयोगाच्या भरारी सर्वत्र नाकाबंदी करून गाड्यांची कसून तपासणी करताना दिसत आहेत. आतापर्यंत राज्यात शेकडो कोटींची रोकड, सोने




आणि चांदी जप्त केली आहे. आजही विक्रोळी पोलीस आणि निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने एक कॅश व्हॅन अडवून तपासणी केली असता सर्वांना धक्का बसला. कारण कॅश व्हॅनमध्ये चांदीच्या विटा सापडल्या, ज्या साडे सहा टन वजनाच्या आहेत. त्यांची आजच्या बाजारभावानुसार किंमत जवळपास ६० कोटींच्या घरात आहे. चांदीच्या विटा ब्रिंक्स कंपनीच्या गाडीतून मुलुंडमधील एका गोदाममध्ये ठेवण्यासाठी जात होत्या. या विटा अधिकृत असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी आता निवडणूक आयोग, इन्कम टॅक्स आणि पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच मुंबईतील वडाळा येथून १४५७.२४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे चेंडू सापडले होते. ज्याची किंमत १ कोटी ११ लाख रुपये होती. सोन्याचे चेंडू अब्दुलकर मजीद या इलेक्ट्रिशियनकडे सापडले होते.

# लवकरच होणार उरण-पनवेल मार्गाचे रुंदीकरण ; वाहनचालकांना दिलासा

वृत्तसंस्था

**नवी मुंबई** : सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असणाऱ्या बोकडवीरा पोलिस चौकी ते कोट नाकादरम्यानच्या १६०० मीटर लांबीच्या उरण पनवेल मार्गाचे रुंदीकरण होणार आहे. त्यामुळे ७ मीटर रुंद असलेला हा मार्ग आता १४ मीटर रुंद होणार आहे, तसेच या मार्गाला दुभाजकही बसविण्यात येणार आहेत. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदाही काढली आहे,



मात्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने या मार्गाच्या रुंदीकरणाचे काम रखडले आहे. हे काम निवडणूक संपताच सुरू होणार आहे. मार्गावरील वाढत्या वाहनांमुळे अपघातही वाढले आहेत. या मार्गाचे रुंदीकरण करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे.

# हळव्या भाताच्या कापणीनंतर झोडणी सुरु

देशोन्नती वृत्तसंकलन

**पालघरः** भाताचे कोठार म्हणून ओळख असलेल्या पालघर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत भात कापणी सुरु आहे. संभाव्य पडणारा पाऊस व वीटभट्टीच्या कामासाठी स्थलांतर होणारे मजूर या भितीने शेतातच ताडपत्री अंथरूण शेतकऱ्यांनी झोडणीच्या कामाला सुरुवात केली आहे. पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे भात हे एकमेव पीक असून या एकाच



पिकावर येथील ९५ टक्के शेतकरी अवलंबून आहेत.

या वर्षीच्या खरिप हंगामात भात पिकाची कापणी सुरु आहे. वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा या चार तालुक्यांत सध्या रोज पाचशे ते सातशे हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावरील भात पिकाची कापणी केली जात आहे. परतीचा पाऊस कधीही कोसळण्याची शक्यता असल्याने तसेच दिवाळी झाल्यानंतर येथील मजूर वीट भट्टीच्या कामासाठी भिवंडी, कल्याण तालुक्यात जाण्याच्या तयारीत असल्याने येथील शेतकऱ्यांनी झोडणीचे कामही उरकून घेण्यास सुरुवात केली आहे.



**बोर्ली पंचतन** : श्रीवर्धन तालुक्यातील विस्तीर्ण असे समुद्र किनारे , नारळी पोफळीच्या बागा , मासे तसेच मंदिरे पर्यटकांसाठी नेहमीचं आकर्षण ठरत असतात. शाळांना दिवाळीच्या सुट्टया असल्यामुळे श्रीवर्धन कडे पर्यटकांचा कल वाढू लागला आहे त्यामुळे दिवाळी सुट्यांमध्ये श्रीवर्धन मधील दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर येथील पर्यटन फुललेले दिसून येत आहे.

# करंजेपूल परिसरात मेंढ्यांवर लांडग्याच्या टोळीचा हल्ला

देशोन्नती वृत्तसंकलन

**सोमेश्वरनगर** : करंजेपूलजवळील गायकवाडवस्ती (ता. बारामती) येथील मेंढपाळवस्तीतील मेंढ्यांवर शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास लांडग्यांच्या टोळीने हल्ला केला. या हल्ल्यात सात मेंढ्या मृत झाल्या आहेत, तर पाच जखमी आहेत. याशिवाय लांडग्यांनी चार कोकरी पळवून नेली आहेत. मेंढपाळाने वनविभागाकडे आर्थिक नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

साळू यदू मोटे यांनी शनिवारी (ता. ९) सायंकाळी मेंढ्या वाडग्यात वाघर लावून सुरक्षित कोंडल्या होत्या. मात्र मध्यरात्रीच्या सुमारास चार ते पाच लांडग्यांच्या टोळीने या वाडग्यावर हल्ला करत वाघर दातांनी तोडली. मेंढ्यांमध्ये घुसून सात मेंढ्यांची नरडी फोडून रक्त पिऊन घेतले. आणखी चार-पाच मेंढ्या जखमी केल्या. पोबारा करताना चार कोकरांना पळवून नेले आहे. याबाबत वनपाल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक माया काळे यांनी पंचनामा केला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली जाधव यांनी शवविच्छेदन केले. याप्रसंगी वनकर्मचारी नंदकुमार गायकवाड, नवनाथ रासकर उपस्थित होते. माया काळे यांनी, वनविभागामार्फत मेंढपाळांना या प्रकरणी संपूर्ण सहकार्य केले जाईल, असे स्पष्ट केले.

# लोकसभेतील 'नरेटिव्ह' ला आता जनता फसणार नाही

देशोन्नती वृत्तसंकलन

**नाशिक** : लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेससह विरोधकांनी संविधान बदलणार असल्याचे नरेटिव्ह पसरविले होते. त्याचा फटका भाजपाला महाराष्ट्रात बसला परंतु त्याची पुनरारावृत्ती आता होणार नाही असा दावा केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरण रिजीजू यांनी केला.

संविधानाच्या प्रती हातात घेऊन त्याविषयी भाजपावर खोटे आरोप केले जात आहेत. लोकसभा निवडणुकीत जे नरेटिव्ह पसविले होते तोच प्रयत्न पुन्हा होतो आहे. परंतु यावेळी महाराष्ट्रातील जनता फसणार नाही. तर उलट जोरदार प्रत्युत्तर मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

### विकासासाठी स्वतः पंतप्रधान मोदी प्रयत्नशील

मंत्री रिजीजू म्हणाले, महाराष्ट्र हे देशातील महत्त्वाचे राज्य असून, राज्याच्या विकासासाठी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. महायुतीच्या काळात मोठ्या प्रमाणात विकासकामे होत आहेत. राज्यातील समृदधी महामार्ग देशात दुसरा नाही. महायुतीच्याच काळात महाराष्ट्राने अधिक आर्थिक प्रगती केल्याचाही दावा केला.

कॉलेजरोड परिसरात भारतीय जनता पक्षाच्या मीडिया सेंटरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. मंत्री रिजीजू पुढे म्हणाले,

### केंद्रीय कायदा मंत्री किरण रिजीजू यांचा दावा



**सुविचार :** मनुष्याने कधीही आपल्या कर्माचा त्याग करू नये.

## डोनाल्ड ट्रम्प आणि भारत....!


डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अनपेक्षितपणे घवघवीत यश मिळवित पुन्हा एकदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनण्याचा सन्मान प्राप्त केला. एकदा पराभूत झाल्यानंतर पुन्हा अध्यक्षपदी निवडून येणारे ते केवळ दुसरे राष्ट्राध्यक्ष ठरले आहेत. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अमेरिकेतील सात राज्ये निर्णायक मानली जातात. या सातही 'स्विंग स्टेटस्' मध्ये ट्रम्प यांनी बाजी मारली. ट्रम्प यांच्या विजयानंतर जगभरातील राष्ट्रप्रमुखांनी त्यांचे अभिनंदन केले, तसे पंतप्रधान मोदींनीही केले, परंतु ती शेवटी एक औपचारिकता असते. पुढच्या जानेवारीच्या २० तारखेला अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर ट्रम्प आपली विदेश धोरण कोणत्या दिशेने पुढे रेटतात ते महत्त्वाचे आहे. भारत आणि अमेरिकेचा विचार करायचा झाल्यास गेल्या दोन दशकांपासून या दोन्ही देशांदरम्यान सहकार्याचीच भावना दिसून येते. वाजपेयी सरकारने पोखरणमध्ये अणुचाचणी केल्यानंतर अमेरिकेने भारतावर बरेच निर्बंध लादले होते, परंतु नंतरच्या काळात अमेरिकेची भूमिका बदलत गेली. डॉ. मनमोहनसिंग सरकारच्या काळात भारत आणि अमेरिकेदरम्यान महत्वाचा अणुकरार अस्तित्वात आला. गेल्या दोन दशकात भारतानेही अनेक बाबतीत कात टाकली आहे. भारताचा आर्थिक विकास चांगल्या गतीने सुरू आहे. पायाभूत सुविधांच्या बाबतीत भारताची प्रगती लक्षणीय आहे. जागतिक राजकारणातही भारताचे महत्त्व चांगलेच वाढले आहे. विशेषतः कोरोना काळानंतर जागतिक राजकारण आणि अर्थकारण बरेच बदलले आहे. या कोरोनोत्तर काळातच भारत आणि अमेरिकेचे संबंध अधिक दृढ झाल्याचे पाहायला मिळते. भारत अमेरिकेसाठी आता केवळ एक बाजारपेठ राहिलेला नाही. या दोन्ही देशांदरम्यान अलीकडील काळात झालेल्या विविध करारातून हे प्रामुख्याने जाणवते. भारतासारखा देश बरोबर असणे हे अमेरिकेसाठी राजकीयदृष्ट्या देखील अनिवार्य झाले आहे. त्यामुळेच उभय देशांत आर्थिक गुंतवणुकीबरोबरच अद्यायावत संवेदनशील तंत्रज्ञान हस्तांतरणासंदर्भातील करारही झाले आहेत. भारतासमोर चीनचे जसे मोठे आव्हान आहे तसेच ते अमेरिकेसमोरही आहे आणि त्यामुळेच चीनवर अंकुश ठेवायचा असेल तर अमेरिकेला भारताची गरज भासणार आहेच. कदाचित त्यामुळेच चार वर्षांपूर्वी पूर्व लडाखमध्ये गलवानचा संघर्ष उद्भवला होता तेव्हा अमेरिकेच्या तत्कालीन परराष्ट्र मंत्र्यांनी चीनने भारतावर आक्रमण केल्यास ते अमेरिकेवरचे आक्रमण मानले जाईल असे वक्तव्य केले होते. चीन अमेरिकेचा धोरणात्मक शत्रू आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळातही त्यांनी चीनच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. बायडेन यांच्या काळात चीनचा विषय थोडा बाजूला पडला, अर्थात रशियाने युक्रेनवर केलेले आक्रमण हे त्यामागचे मुख्य कारण होते. रशिया आणि चीन हे अमेरिकेचे दोन प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. रशिया सध्या युक्रेन युद्धात गुंतलेला आहे. रशिया पूर्णपणे डबघाईला येत नाही तोपर्यंत अमेरिका हे युद्ध सुरू ठेवणार आहे. त्यातून एका प्रतिस्पर्ध्याचा बंदोबस्त परस्पर होईल, परंतु चीन हा दुसरा प्रतिस्पर्धी रशियाच्या तुलनेत अत्यंत वरचढ आहे. अमेरिकेची पारंपरिक सामर्थ्याची सर्व क्षेत्रे हस्तगत करण्याचा प्रयत्न चीनकडून होत आहे. त्यामुळे अमेरिकेच्या आशिया खंडातील संरक्षण आणि व्यापारी हितसंबंधांना धोका निर्माण झाला आहे. याचा सामना कसा करायचा हा अमेरिकेपुढे मोठा प्रश्न आहे. त्यासाठी अमेरिकेला भारताच्या सहकार्याची गरज भासणार आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारत आणि अमेरिकेतील संबंध केवळ व्यापारी पातळीपुरते मर्यादित राहणार नाही तर त्याहीपेक्षा व्यापक स्तरावर हे दोन्ही देश परस्परांच्या जवळ येतील. जागतिक पुरवठा साखळीमध्ये भारताचे स्थान मोठे बनावे आणि भारत हा चीनला सक्षम पर्याय बनावा यासाठी अमेरिका प्रयत्नशील आहे. त्यात अर्थातच अमेरिकेचे हितही आहे. कारण भारताचा आर्थिक विकास हा अमेरिकेसाठी पूरक आहे; याउलट चीनचा आर्थिक विकास अमेरिकेसाठी हानीकारक आहे. त्यामुळेच आज अमेरिका भारताला केवळ शस्त्रास्त्रे देत नसून तंत्रज्ञानही देत आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जेट इंजिन आणि प्रिडेटर ड्रोन यांचे उत्पादन आता भारतात होणार आहे. त्याचे तंत्रज्ञान भविष्यात अमेरिकेकडून भारताला हस्तांतरित होणार आहे. एकूण काय तर संपूर्ण आशिया खंडात चीनला टक्कर देणारा भारत हा एकमेव देश असल्यामुळे ट्रम्प भारताला पुढे करण्यासाठी प्रयत्न करतील आणि भारत-अमेरिका संबंध घनिष्ठ बनतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आणणार कुठून....?

निवडणूक म्हटली की 'फुकटछाप' घोषणांची नुसती धुळवड असते. पंतप्रधानांच्याच भाषेत सांगायचे तर मुक्तहस्ते 'रेवडी' वाटली जाते. लोकसभा निवडणुकीत अनपेक्षित दणका बसल्यानंतर महायुतीने काही तरी भरीव केल्याखेरीज विधानसभेत धडगत नाही हे ओळखून 'लाडकी बहिण' योजना आणली. पात्र महिलांना दीड हजार रूपये महिना देण्याची केवळ घोषणाच झाली नाही तर त्यांच्या खात्यात ही रक्कम पोहचती केली गेली. ही योजना महाराष्ट्राचे आर्थिक दिवाळे काढणारे असल्याची टीका अर्थतज्ज्ञांनी आणि विरोधी नेत्यांनीही केली. निवडणुकीपुरती ही योजना आहे, निवडणुकीनंतर ही योजना बंद पडेल असा प्रचार विरोधकांनी सुरू केला. परंतु महिला मतदारांना हा तर्क पटत नसल्याचे लक्षात आल्यावर सगळे आर्थिक तर्क बाजूला ठेवत महायुतीच्याही वरताण ठरेल अशी महालक्ष्मी योजना विरोधकांच्या घोषणापत्रात अवतरली. या महालक्ष्मी योजनेनुसार महिलांना तीन हजार प्रतिमहिना देण्याचे आश्वासन विरोधक देत आहेत. दीड हजार रूपये महिना दिल्याने महाराष्ट्र आर्थिक दिवाळखोरीकडे वाटचाल करीत होता तर या तीन हजारांमुळे तो कुठे जाईल, या प्रश्नाचे उत्तर विरोधकांकडे नक्कीच नसेल. त्याशिवाय प्रत्येकी ५०० रूपयात सहा गॅस सिलेंडर, महिलांसाठी मोफत बस प्रवास, जन्मलेल्या प्रत्येक मुलीच्या नावे ठराविक रक्कम बँकेत जमा करणे, सुशिक्षित बेरोजगारांना प्रतिमहिना चार हजार रूपयांचा भत्ता आणि नेहेमीप्रमाणे शेतकऱ्यांना कर्जमाफी अशा आकर्षक घोषणांनी महाविकास आघाडीचा जाहीरनामा नटला आहे. आता ही फुकट वाटण्याची स्पर्धा अजून कुठपर्यंत जाईल हे सांगता येणार नाही. परंतु आधीच तोळामासा असलेली महाराष्ट्राची अर्थव्यवस्था या सगळ्या फुकटछाप योजनांचे ओझे सहन करू शकेल का, याबद्दल कुणीच बोलायला तयार नाही. अशा योजना घोषित करायला हरकत नाही, परंतु त्यासोबतच या योजनांसाठी लागणारा पैसा कुठून आणि कसा उभा केला जाईल, याचेही स्पष्टीकरण संबंधित पक्षांनी द्यायला हवे. तसे काही होणार नाही, कारण या योजनांसाठी पैसा कुठून आणणार याचे नियोजन या लोकांकडे नसले तरी निवडणुका झाल्यावर अशा योजना बासणात गुंडाळून ठेवण्याची कला त्यांच्यात अंगभूतच आहे.

### स्टेट लाइन

# रेवड्यांची उधळण...



डॉ. सुकृत खांडेकर
9594224000

राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुती (भाजपा, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस अप) आणि महाआघाडी (काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शप, उबाठा सेना) एकमेकांच्या विरोधात दंड थोपटून प्रचार करीत आहेत. सहा राजकीय पक्षांमध्ये वर्चस्वाची आणि अस्तित्वाची लढाई आहेच; पण ही निवडणूक मोदी जिंकणार की, राहुल गांधी असा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या सभांनी निवडणुकीतील चुरस वाढली आहे. भाजपा विरुद्ध काँग्रेस, महायुती विरुद्ध महाआघाडी अशा लढाईत एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. या दोन आजी-माजी मुख्यमंत्र्यांची रणनिती आणि मुत्सद्देगिरी यांची या निवडणुकीत मोठी परीक्षा आहे.

महायुती आणि महाआघाडीकडून विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने निवडणूक जाहीरनामे घोषित झाले. युती आणि आघाडीने मोफत कल्याणकारी योजना आणि सवलतींचा वर्षाव करून मतदारांना आकर्षित करण्याचा जोरदार प्रयत्न केला. सत्ता काबीज करण्यासाठी सरकारी खजिन्याची पर्वा न करता, वाट्टेल ते करण्याची तयारी महाआघाडी व महायुतीच्या नेत्यांची आहे, असे चित्र महाराष्ट्रातील जनतेला दिसले. महायुतीच्या सरकारकडून सध्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांतर्गत लाडक्या बहिणीला दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. आचारसंहिता सुरू होण्यापूर्वीच लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात तीन महिन्यांचे पैसे जमा झाले आहेत. शिवाय अनेकांना दिवाळी बोनसचा लाभ मिळाला आहे. राज्यात तब्बल २ कोटी ४० लाख लाडक्या बहिणी लाभार्थी आहेत. जवळपास अडीच कोटींची लाडक्या बहिणींची व्होट बँक हा महायुतीचा या निवडणुकीत भक्कम आधार बनला आहे. लाडक्या बहिणींच्या व्होट बँकेने महाआघाडीतील तिन्ही प्रमुख पक्षांना अक्षरशः घाम फुटला. लाडकी बहीण योजनेसाठी ९० हजार कोटी खर्च होणार आहेत. पुन्हा सत्तेवर आल्यानंतर लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन महायुतीने दिले आहे. त्याशिवाय २५ हजार महिला पोलिसांची भरती, वृद्ध व्यक्तींना दरमहा २१०० रुपये पेन्शन, शेतकऱ्यांना कर्जमाफी व वर्षाला १५ हजार रुपये, जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर, २५ लाख रोजगार निर्मिती, ४५ हजार गावांत रस्ते, अंगणवाडी व आशा सेविकांना दरमहा १५ हजार रुपये वेतन व विमा सुरक्षा, वीज बिलात ३० टक्के कपात, व्हिजन महाराष्ट्र २०२९ या प्रकल्पाचा आराखडा शंभर दिवसांत सादर करणार, अशी सुंदर स्वप्न रंगवणारी आश्वासने दिली आहेत.

महाआघाडीनेही महायुतीच्या धर्तीवर रेवड्यांचा वर्षाव केला आहे. सत्तेवर आल्यानंतर महिलांना दरमहा ३ हजार रुपये, महिला व मुलींना राज्यात एसटी व बेस्ट बसमधून मोफत प्रवास, मुंबईच्या लोकल ट्रेनमधून महिलांना मोफत प्रवास मिळावा म्हणून रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा, जातिनिहाय जनगणना व आरक्षणाची असणारी ५० टक्के मर्यादा हटवणार, २५ लाखांपर्यंत आरोग्यविमा व मोफत औषधे, शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये, बेरोजगार तरुणांना महिना ४ हजार रुपये, पाच जीवनावश्यक वस्तूंच्या पाच वर्षे किमती स्थिर, इत्यादी... राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांची बोलकी प्रतिक्रिया आहे. ते म्हणतात- महाआघाडीने निवडणूक जाहीरनाम्याच्या निमित्ताने पंचसूत्री जाहीर केली. महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी ७५ हजार कोटींची तरतूद केली आहे. महाआघाडीची पंचसूत्री राबवायचे म्हटले तर किमान तीन लाख कोटी लागतील. राज्याचे बजेट साडेसहा लाख कोटींचे आहे. मोफत योजनांवर एवढा मोठा निधी खर्च होऊ लागला, तर कर्मचाऱ्यांच्या वेतनालाही पैसे उरणार नाहीत...


बहिणींची व्होट बँक विधानसभा निवडणुकीत महाआघाडीला भारी पडणार, असे भाजपा-शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते ठामपणे सांगत आहेत.

अरविंद केजरीवाल यांच्या दिल्ली सरकारने तेथील जनतेला वीज, पाणी, शिक्षण, आरोग्यसेवा, मोफत देऊ केली तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केजरीवाल सरकारच्या रेवडी कल्चरवर कडक शब्दांत टीका केली होती. अशा रेवड्यांनी अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो, असा इशारा दिला होता; पण विविध राज्यांनी निवडणुकीच्या काळात मोफत रेवड्यांचा वर्षाव सुरू केला. मतदारांना फुकट घेण्याची सवय लावण्यात सर्वच राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा सुरू झाली. आता कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, दिल्ली येथील रेवड्यांचे लोण महाराष्ट्रात पोहोचले आहे. मतांसाठी सारे राजकीय पक्ष मतदारांना फुकटे बनवू पाहात आहेत.

महाआघाडीचा जाहीरनामा म्हणजे महायुतीची मसुद्याची नक्कल किंवा कॉपीपेस्ट आहे. महायुतीपेक्षा आम्ही कसे जास्त उदार आहोत, हे महाआघाडी सांगत आहे. लाडक्या बहिणींना आम्ही जास्त पैसे देणार, असे महाआघाडी ठसवत आहे. करदात्यांचे पैसे कोण कोणाला कोणी मागत नसताना देत सुटले आहोत, अशी महाराष्ट्रात अवस्था आहे. महाआघाडीच्या विशेषतः उबाठा सेनेचे नेते लाडक्या बहिणींना दरमहा आम्ही तीन हजार रुपये देणार शिवाय भावांचीही आम्ही काळजी घेणार असे ठामपणे सांगत आहेत. महायुतीने केवळ मुलींना शिक्षण मोफत दिले, आम्ही सत्तेवर आल्यावर मुलांना मोफत उच्च शिक्षण देणार, असे आघाडीचे नेते सांगत आहेत. लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीत खडखडाट झाला, असे अगोदर म्हणणारे स्वतःच रेवड्या वाटू लागले आहेत. मुलांना मोफत शिक्षण म्हणजे कुठे देणार, कोणाला देणार, सरकारी शाळांची संख्या सतत कमी होत आहे मग खासगी शाळातील मुलांना मोफत शिक्षण देणार का? काँग्रेस, उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस अनेक वर्षे सत्तेत होती मग तेव्हा त्यांनी मुलांना मोफत उच्च शिक्षण का नाही दिले? भूमिपुत्रांना घरे देऊ अशी घोषणा करतात; पण भूमिपुत्र म्हणजे कोण हे कधी ते बोलत नाहीत. गिरणी कामगारांच्या संपानंतर चार दशके उलटली तरी अजूनही दीड लाख गिरणी कामगारांना घरे मिळाली नाहीत, यावर कोणी ब्र सुद्धा काढत नाहीत. मुंबईतून मराठी माणूस विरार, पालघर, पनवेल, बदलापूर, कर्जत, टिटवाळ्याला गेला तरी कोणाला चिंता नाही. मुंबईत मराठी भाषिकांची टक्केवारी लक्षणीय घटली आहे (अंदाजे वीस-बावीस टक्के) त्यावर कधी चर्चा होत नाही. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभारणार असे सांगतात, पण अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे राहणार होते, त्याचे काय झाले त्यावर कोणी चकार शब्द बोलत नाही. महाराष्ट्र- कर्नाटक सीमा प्रश्नाची कोणाला आठवणही नाही. गेल्या दशकभरात महाराष्ट्राची पिछेहाट झाली आहे, असे पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालातच म्हटले आहे. सकल उत्पन्नात राज्याचा वाटा घटला आहे. दरडोई उत्पन्नात गुजरातची प्रगती झाली आहे. तेलंगणा, गुजरात, कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू, पंजाब ही राज्ये पुढे सरकत आहेत; मात्र महाराष्ट्रात सारे राजकीय पक्ष रेवड्यांची उधळण करण्यात मश्गूल आहेत.

### वास्तव

# पक्षफुटीचा फायदा घेणारी भाजपा व मनसेची रणनीती!



प्रा. डॉ. विनोद गायकवाड
9850324202
राजकीय अभ्यासक

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ऐतिहासिक होत आहे. सहा मोठे राजकीय पक्ष दोन मोठ्या आघाड्या करून निवडणूक लढवीत आहेत. पारंपरिक प्रतिस्पर्धी विरुद्ध पक्षातील प्रतिस्पर्धी, अशी ही निवडणूक होत आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील पक्ष फोडाफोडीचे राजकारण विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा केंद्रबिंदू ठरला. महाराष्ट्रात झालेले सत्तांतर, पक्षात पडलेली फूट, पक्ष व चिन्ह आणि नवीन युती व आघाडी इत्यादींचा खुलासा प्रचार सभेत होताना दिसतो. जनतेसमोर जाताना खरे-खोटे मांडण्याची जणू स्पर्धाच लागली. पक्ष फोडाफोडीचे राजकारण चिखल बनल्याने त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न मनसेने सुरू केला. शिवसेना आणि धनुष्यबाण ही बाळासाहेबांची प्रॉपर्टी, तर घड्याळ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे शरद पवारांचे अपत्य, दादांचे नाही असे मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एका प्रचार सभेत जे भाष्य केले त्यावरून दोन्ही गटांत कलगीतुरा रंगला. पक्ष हा प्रॉपर्टी आहे, असे गृहीत धरल्यास त्यावर अधिकार उद्धव ठाकरेंचाच राहील. तिकडे राष्ट्रवादीवर अधिकार शरद पवारांचाच राहील. कारण त्यांनी तो पक्ष स्थापन केला, वाढविला आणि केंद्रात व राज्यात सत्तेपर्यंत पोहोचविला. बाळासाहेबांनंतर आणि पवार साहेबांच्या हयातीत सत्तेची फळे इतरांनी चाखली. राजसत्तेप्रमाणे पक्षसत्ता बनविल्याने राजकारणात घराणेशाही स्थिरावली. राज ठाकरे पक्ष आणि चिन्हांबाबत यावेळी बोलले; मात्र त्याला जनतेची सहानुभूती लोकसभा निवडणुकीत मिळाली. एकीकडे भाजपाला पाठिंबा, तर दुसरीकडे महायुतीतील शिंदे गट आणि अजितदादा गट याविरोधात भूमिका घेतली. या मागे भाजपा आणि मनसे हे दोन्ही पक्ष निवडणुकीनंतर एकत्रित सत्ताकारण करणार असल्याचे दिसते. मनसेच्या साथीने राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री होणार असल्याचे भाकीत स्वतः राज ठाकरे यांनी केल्याने दोन्ही पक्षांतील पुढील रणनीती स्पष्ट दिसते. लोकसभेची परतफेड म्हणून भाजपाची भूमिका मनसेला सहकार्याची वाटते. म्हणूनच काही ठिकाणी दोन्ही पक्षांत मैत्रीपूर्ण लढत होत आहे. हिंगणा विधानसभा मतदारसंघात मनसेचा उमेदवार असताना भाजपाच्या उमेदवाराला मनसेने जाहीर पाठिंबा दिला.

मनसेची काही मतदारसंघांत महायुती विरोधी, तर काही मतदारसंघांत पाठिंबाची भूमिका आहे. माहीम विधानसभा मतदारसंघातून शिंदेंच्या शिवसेनेने माघार न घेतल्याने मनसेने मुंबईत शिंदे गटा विरुद्ध ११, भाजपा विरुद्ध १० उमेदवार उभे केले, तर दुसरीकडे भाजपा लढणाऱ्या ०७ जागांवर आणि शिंदे लढणाऱ्या ०४ जागांवर उमेदवार दिले नाहीत. येथे ठाकरेंच्या शिवसेने विरोधात रणनीती आखल्या गेली. ५१ जागांवर शिवसेना विरुद्ध शिवसेना सरळ लढत, तर बारामतीत काका विरुद्ध पुतणे अशी लढत होत असल्याने निवडणुकीतील रंगत वाढली. नवाब मलिक हे राष्ट्रवादीचे उमेदवार असले तरीही ते महायुतीचे उमेदवार नाहीत, म्हणूनच भाजपा मलिकांचा प्रचार करणार नाही. मलिकांवर फक्त आरोप आहेत, आरोप असलेले मुख्यमंत्री आहेत, असे म्हणत प्रफुल पटेल यांनी मलिकांच्या उमेदवारीचे समर्थन केले. भाजपाने लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीत मुस्लीम विरोधी भूमिका घेतल्याचे दिसते. व्होट जिहादचा मुद्दा प्रामुख्याने पुढे आणला. ती पोकळी भरून काढण्यासाठी भाजपा हा ओबीसींचा नैसर्गिक मित्र असल्याचे भासविले जात असले तरीही ओबीसींचे राजकीय आरक्षण न्यायालयीन लढाईत अडकल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या चार वर्षांपासून रखडल्या. विधानसभेच्या २८८ जागांकरिता ८२७२ उमेदवार रिंगणात आहेत. काही स्वतः उभे राहिलेत, तर काहींना जातीय समीकरणे आखून उभे केल्या गेले. नवीन तडजोडींमुळे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत उमेदवारांची संख्या वाढली. महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरी झाली. अजितदादांच्या आठ उमेदवारांविरोधात उमेदवारी न मिळालेले शिवसेना व भाजपाचे बंडखोर उभे आहेत. त्यामागे निवडणुकीनंतरची बहुमताची जुळवाजुळव दिसते. १९९५ मध्ये बंडखोरांच्या पाठिंब्यावर सेना-भाजप युतीचे सरकार आले होते. त्याची पुनरावृत्ती म्हणजेच भाजपाला त्यांची गरज भासू शकते. भाजपाने बंडखोरी करणाऱ्या चाळीस नेत्यांची पक्षातून हकालपट्टी केली असली, तरी त्यापैकी जे निवडून येतील ते उद्या भाजपासोबत बसतील. आपल्या पक्षाकडून तिकीट न देता आपला उमेदवार मित्र पक्षाला देऊन त्याला त्या पक्षाच्या निवडणूक चिन्हावर लढविण्याची रणनीती आखल्या गेली. भाजपाने १४८ जागांवर उमेदवार दिले तरी वरील पद्धतीने पुरस्कृत उमेदवारांची गोळाबेरीज केल्यास भाजपाचे एकूण १७० उमेदवार होतात. असे उमेदवार निवडून आल्यास ते बहुमताच्या आकडेवारीत कामात येऊ शकतात. शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष फुटल्याने एकमेकांवर चिखलफेक सुरू आहे. निश्चितच त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न भाजपा करीत आहे. या दोन्ही गटांचे कमी उमेदवार निवडून आल्यास त्यांचा आपोआप दबाव कमी होईल, मग भाजपाला अपेक्षित पद्धतीने त्यांना हाताळता येईल. निकालानंतर सत्तासमीकरणे बदलणार असल्याचे मत नेतेमंडळी जाहीरपणे मांडत आहेत ते सूचक आहे.

५० खोके, गद्दारी, मिंधे, हिंदुत्व, बाळासाहेबांचे विचार, झाडी-डोंगर, पक्ष व चिन्ह, अभद्र आघाडी, निवडणूक आयोग, न्यायालय इत्यादींची चर्चा गेल्या अडीच वर्षांपासून दिवसातून एकदा तरी झाली. म्हणूनच जे घडले ते योग्य की, अयोग्य या भोवती निवडणूक प्रचार फिरतो आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर नरेटिव्हचे राजकारण स्थिरावले. राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो, तर परिस्थिती बदलत राहते. म्हणून शत्रू मित्र होतात, तर मित्र शत्रू होतात. अशी अपेक्षा व्यक्त करून बहुमतासाठी कोणीही केव्हाही एकत्र येणार असेल, तर मग असे राजकीय वैर कशासाठी? कार्यकर्त्यांनी एकमेकांविरुद्ध प्रचार केल्यानंतर वरिष्ठ स्तरावर झालेले मनोमिलन खाली कार्यकर्त्यांच्या स्तरावर अडचणीचे ठरते. पक्षफुटीमुळे आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न चिघळल्याने हा संघर्ष न्यायालयापर्यंत गेला; मात्र सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय न आल्याने आमचाच गट योग्य असे चारही गट स्पष्टीकरण देत आहेत. असो, मुख्यमंत्री पदाकरिता मागील पाच वर्षे रामायण घडले, तर पुढील पाच वर्षे महाभारत घडेल असे एकूणच चित्र दिसते.

### मनाचिये गुंती

# चार दिवसांची दिवाळीची धामधूम..



वैशाली पाटील
9420350171

दिवाळी सण नेहमीप्रमाणे आला आणि गेलाही...सण अवघ्या चार दिवसांचा; पण त्याची तयारी महिना पंधरवाड्यापासून असते. लख्ख झालेला प्रत्येक कोपरा न् कोपरा मनालाही तजेला देत असतो. साफसफाई करताना बरंचसं न लागणारं सामानही कमी करण्याचा आपला प्रयत्न असतो. तरीही काही वस्तू आठवणींच्या रूपात परत ठेवण्याचा आपला मोह आवरला जात नाही, तर काही 'अधूनमधून लागू शकतील' म्हणून पुन्हा पॅक करून ठेवल्या जातात. मग सुरू होतो घराघरांतून तीन-चार दिवस दरवळणारा खमंग सुवास..या सगळ्यामागे भरपूर कष्टही असतात आणि तितकाच उत्साहही. ही सगळी धावपळ, आवराआवर घरातील गृहलक्ष्मी देवी महालक्ष्मीच्या स्वागतासाठी करत असते. घरातल्या धनलक्ष्मी, धैर्यलक्ष्मी, सौख्यलक्ष्मीच्या आशीर्वादासाठी सतत अहोरात्र झटणारी गृहलक्ष्मी चार दिवस कमालीची थकलेली असते. तरीही समाधानाने चेहरा तृप्त असतो तिचा. या थकव्यातून आराम मिळावा म्हणूनच भाऊबीजेचं माहेरपण पूर्वीपासून आपल्या संस्कृतीत जोडले गेले ते मुळी विसाव्यासाठी आणि कौतुकासाठीच जणू...

या सर्व धावपळीत घरातील गृहलक्ष्मीला मदत करणारी अजून एक कार्यलक्ष्मी तिचा आधार बनलेली असते...तिचीच खरी कमाल असते. ती म्हणजे सगळ्या धामधूमीत मदत करणाऱ्या मदतनीस महिलेची. अर्थात कार्यलक्ष्मीची! प्रत्येक घरात दिवाळीची कामं काढली जातात तसा त्यांच्यावरही कामाचा ताण वाढतोच..वाढलेले धुण्याचे कपडे..जास्तीचे डबे, बरण्या..फराळाची भांडे..आणि घरातले कानेकोपरे.. या सर्वात त्यांची मदत हाच आधार हा गृहलक्ष्मीसाठी खूप मोठा असतो...त्यांच्या सहकार्याशिवाय हे सगळं नक्कीच अवघड आहे...

तेही या संधीचं सोनं करून घेतात..एरवी जास्तीचं काम सांगितलं तर कंटाळा करतात; मात्र या दिवसात मदत करायला एका पायावर तयार असतात..भरपूर उर्जा पणाला लावतात...आणि मेहनतीने दहा-पंधरा दिवसात मिळणाऱ्या जास्तीच्या कमाईने मुला-बाळांची दिवाळी आनंदाची करण्याचा पुरेपूर प्रयत्न करतात..

'ताई आता मी थकले..दोन दिवस मी आता घरी रहाते..' असं जेव्हा मदतनीस म्हणते तेव्हा समोर जणू डोंगर कोसळतो..

आपल्या मालकणीचा दिवाळसण आनंदी होण्यासाठी सणाच्या दिवशीही कामाला येणाऱ्या या बायकांचं कौतुक करावं तितकं कमीच आणि त्यांच्यामुळे होणारा आधार आपण दिलेल्या मोबदल्यापेक्षा निश्चितच मोठा..त्यामुळं अर्थात त्यांच्यासाठीसुद्धा देवी महालक्ष्मीकडे प्रार्थना करावीशी वाटते, की त्यांना ही भरपूर आरोग्य आणि धन संपदा लाभो. तुम्हाला काय वाटते मैत्रिणींनो...

### वाचक विचार मंच

## निवडणुकीच्या निमित्ताने, कोटी कोटी रूपे तुझी...

अपक्ष उमेदवारांसह विविध राजकीय पक्षांच्या काही उमेदवारांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून सादर केलेली कोट्यवधी रुपयांची संपत्ती आणि या संपत्तीमध्ये गेल्या पाच वर्षांत पाच- दहा पटीने झालेली कोट्यवधी रुपयांची वाढ पाहून सर्वसामान्यांचे डोळे विस्फारले नसते तरच नवल! मुंबईतील एका उमेदवाराची संपत्ती तर २०१९ च्या निवडणुकीत ५००.६२ कोटींवरून २०२४ च्या निवडणुकीत ३३८३.०६ कोटींवर पोहोचली आणि हा उमेदवार या निवडणुकीतला राज्यातील सर्वात श्रीमंत उमेदवार ठरला. उमेदवारांच्या संपत्तीत झालेल्या या प्रचंड वाढीची अनेक कारणे असतील, ती आपल्याला माहीत नाहीत; पण तो एक अभ्यासाचा आणि संशोधनाचा विषय मात्र होऊ शकतो. दुसरीकडे राज्यात सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या काळात पैशांचा प्रचंड गैरवापर होत असून संपूर्ण राज्यातील अनेक भागांत विविध शासकीय यंत्रणांनी आतापर्यंत ७८ कोटी रुपयांच्या रोख रकमेसह तब्बल ३०० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्रचार संपेपर्यंत हा आकडा ५०० कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. निवडणुकीच्या निमित्ताने समोर आलेली ही कोट्यवधी रुपयांची विविध रूपे पाहून जनसामान्य मात्र अवाक झाले आहेत.

**प्रदीप शंकर मोरे**
मुंबई, मो. नं.: ९८७०७७७२७४

## ..यातून कोणते जनहित साध्य होणार?

सर्वसामान्य जनता कोणत्या अवस्थेत जगत आहे, याचे राजकारण्यांना देणे-घेणे नाही. वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप, टीव्ही चॅनेल्सवर येऊन वादविवाद हेच सुरू आहे. एकमेकांवर टीकाटिप्पणी, खालच्या पातळीवर जाऊन काहीही बोलणे यातून कोणते जनहित साध्य होणार आहे? एकेरी उल्लेख करून बोलणारे नेते कोणती सद्भावना जोपासत आहेत? नेत्यांच्या बेताल वक्तव्यांनी सामाजिक स्वास्थ्यास मात्र धोका निर्माण झाला आहे.

**प्र.मु. काळे, सातपूर,** नाशिक,
मो. नं.: ९२७३०४५७९४

**सांगा काय करावे?**

लाडकी बहीण एकीकडे
महालक्ष्मी दुसरीकडे
कुणाला मी मत देऊ?
अय्या गडे! ईश्श गडे!!

मावशी म्हणाली पेंद्या
खरंच खूप पडला पेच
इकडे जाऊ की तिकडे जाऊ?
मनात प्रश्न येतात तेच तेच

मतदारांना उमेदवार यंदा
बघ किती देताहेत भाव
'देवा-दादा'संगे 'नाथां'नी
केलाय घोषणांचा 'वर्षा'व

'शरदा'च्या चांदण्यात
दिस 'सोनिया'चे यावे म्हणून
'आय' म्हणाली 'मातोश्रीं'ना
आपण कोणते आश्वासन द्यावे?

'खास-दारा'तून दिल्ली गाठली
'आम-दारा'तून कशी गाठू मुंबई
त्यासाठी काय करता येईल?
त्यावर उपाय सांगा काही

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

### संवाद

# कौटुंबिक विसंवाद चिंताजनक

समाजात उच्च शिक्षितांमध्ये घटस्फोटांचे प्रमाण वाढत असल्याचा निष्कर्ष कौटुंबिक व्यवस्थेशी संबंधित मुद्दांवर अलीकडच्या काळात पार पडलेली विविध सर्वेक्षणे नोंदवतात. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात देखील कौटुंबिक अस्वस्थतेचे प्रतिबिंब उमटल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध होत असते. हे विश्वची माझे घर, अशी संस्कृती जोपासल्याचा अभिमान बाळगणाऱ्या समाजाला ही स्थिती भूषणावह नक्कीच नाही. कारण कौटुंबिक बेबनावाचे व्यापक दूरगामी परिणाम समाजाला भोगावे लागतात. घटस्फोटांचा मुद्दा चर्चिला गेला म्हणून त्याचे निष्कर्ष चर्चिले जातात. तथापि एकूणच सगळ्या नातेसंबंधांमध्ये बेबनाव आढळतो. कौटुंबिक बेबनावाचे आणि संवादाच्या अभावाचे विपरीत परिणाम आढळतात. त्यामुळे अडनिड्या वयाची मुले टोकाला जातात. अनेक मुले घर सोडून जातात. काही जण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. आई-वडिलांच्या विभक्त होण्यात त्यांच्या मुलांचा काहीही हातभार नसताना ते त्या बेबनावाचे बळी ठरतात. घटस्फोटित अनेक जोडप्यांची मुले एकलकोंडी होतात. त्यांचा भावनिक कोंडमारा होतो. कौटुंबिक वीण अशी उसवत का चालली असावी, हा प्रश्न निर्माण होतो. कुटुंबातील सदस्यांच्या तणावाची कारणे वेगवेगळी असू शकतील. तथापि कुटुंब म्हणून एकमेकांप्रती आदर, प्रेम, जिव्हाळा आणि समजून घेण्याची क्षमता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे.




स्वप्रतिमेवरचे प्रेम किंवा त्यांची जाणीव टोकाला जात आहे का? माझेच बरोबर याचा अट्टाहास वाढत चालला असावा का? विविध पातळयांवर स्वतःला जोखण्याची सवय जडत चालली असावी का? असे अनेक प्रश्न अस्वस्थ करणारे ठरतात. ज्याचा विचार प्राधान्याने केला जाण्याची आवश्यकता आहे. स्वतःचा आदर करायला, स्वतःवर प्रेम करायला न शिकणाऱ्या माणसांना इतरांची तीच भावनिक गरज लक्षात येत नसेल, तर ते स्वाभाविक मानले जाऊ शकेल. कुटुंब संयुक्त असो किंवा छोटे, संस्कारांचे महत्त्व तेवढेच आहे. स्वतःवर प्रेम करणे, त्यात ज्येष्ठांनी बदल सुचवले, तर त्यातील तथ्य समजून घेणे, आदर देणे, दुसऱ्याची भूमिका आधी समजून घेणे, प्रतिक्रिया न देता प्रतिसाद देणे, अशा अनेक मुद्दांचा त्यात समावेश होऊ शकेल. कौटुंबिक विसंवादाची अशी अनेक कारणे सांगितले जाऊ शकतात, ज्याचा एकत्रित विचार करून समाजाच्या वाटचालीला दिशा देण्याचे प्रयत्न जाणत्यांना करावे लागतात. ज्यांना याची जाणीव आहे, अशा व्यक्तींनीं त्यांच्या त्यांच्या पातळीवर पुढाकार घेण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर
९५४२०५६६४०४

### गुल्लेर

# पय लवकर



नरेंद्र इंगळे
9561226572

'हॅलो मंग्या...कुठी आहेस? अक्षा बोलतो..येनं इकडे...बारमंधी चार-पाच जनं बसेल आहो..तुहीच वाट पाहून राह्यलो..ये मंग लवकर..'

'कोन देऊन राह्यलं पार्टी?'

'अपक्ष उमेदवार पकडला. त्याले पलट्या मारुन पैसे काढले.'

'ओ वेटर..दोन कॉर्टर..'

'कॉर्टरनं काय होते बे? अद्दा सांग..'

'एक अद्दा..रोस्ट पापड..बॉईल..'

'आज बरा चान्स भेटला गळ्या..'

'चान्स आना लागते.. बत्तीस उमेदवार उभे आहेत.. रोज एक एक गटवला तरी मयना निंगते.'

'आजचा उमेदवार कसा शेपाळला?'

'त्याले घेतलं गेरात.. त्याले म्हटलं विजय तुमचाच आहे.. जरा खर्च पानी करा. आम्ही जनता सांभाळतो.'

'तो आला मंग्या.'

'लवकरच आला बे वासानं?'

'अथीच होतो पानठेल्यापाशी.. तेवढ्यात तुहा फोन आला.'

'घे.. भर गिल्लास.'

'घ्या चालू करा..नाहीतर अदीक कोनी येईन भसकन.'

'येऊ देनं बे..बारमधे येनारे सबन बेसरम असतात..अथीसा सरमून चालत नाही.'

'ओ वेटर. खरमुरे आन बे..निंबू कांदा आन..कशी सर्व्हीस देता बे?'

'घ्या चिअर्स.'

'ओरिजनल हाय..'

'त्याले म्या पह्यलेच म्हटलं की ओरिजनल लागीन..डुप्लीकेट देशीन तं इचार करजो.'

'असंच चालू द्या आता मयनाभर. रोज एक नवा उमेदवार पकडा.'

'मटनाची ऑर्डर देली काय रे?'

'थांबाना. आताच तं आरंभ झाला.. आजून झुनझुनी आली नाही.'

'उद्या अजाबरावले पकडू.. दोन-चार पलट्या मारल्या की तो खिशात हात घालते.'

'ओ अक्षा..तिकडे पाह्य..'

'अरे हूत.. माहा बुढा आला लेका..'

'घ्या दाबून. जथी रात तथीच चोराचा भेव.. बुढ्याले हाच टाईम सापडला?'

'आता कसं? टेबलाखाली लपू काय?'

'भयानला काय? बाटली उचल लवकर..मागच्या दारातून पया लवकर..घे तोंडाले बांधून..'

## ग्रेटर नोएडा एक्स्प्रेसवेवर भीषण अपघात

### एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली:** ग्रेटर नोएडा एक्स्प्रेस वेवर भीषण अपघात झाला आहे. या अपघातात एकाच कुटुंबातील ५ जणांचा जागीच मृत्यू झाला असून त्यात तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. नोएडाहून परी चौकाकडे जात असताना हा अपघात झाला.हे प्रकरण ग्रेटर नोएडा नॉलेज पार्क पोलीस स्टेशन परिसरातील आहे. परी चौकाकडे जाणारी कार ग्रेटर नोएडा एक्स्प्रेस



वेवर मागून उभ्या असलेल्या ट्रकला धडकली आणि या अपघातात एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू झाला. बऱ्याच प्रयत्नांनंतर पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह बाहेर काढले, मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी पाठवले.

## मुस्लिमांना आरक्षण देण्याचा काँग्रेसचा डाव : अमित शहा



**रांची :** गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी झारखंडमधील पलामू, हजारीबाग आणि पोटका येथे निवडणूक सभा घेतल्या आणि जमशेदपूरमध्ये रोड शो केला. शहा यांनी आपल्या भाषणात काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचे सांगितले. मी राहुल गांधींना इशारा देतो की तुमची चौथी पिढीही कलम ३७० परत आणू शकत नाही. शहा म्हणाले, ओबीसी, आदिवासी आणि दलितांचे आरक्षण हिसकावून मुस्लिमांना देण्याचा काँग्रेसचा डाव आहे. काँग्रेस ओबीसी कोट्याच्या विरोधात आहे. उलेमांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांची भेट घेतली तेव्हा १० टक्के आरक्षणाचे आश्वासन दिले.

## मुख्यमंत्री सचिवांच्या घरावर आयकर छापा!

### १५० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त

**रांची :** झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे स्वीय सचिव सुनील श्रीवास्तव यांच्या घरावर आयकर छापा टाकण्यात आला आहे. टीमने सुनील कुमार श्रीवास्तव आणि त्याच्या साथीदारांच्या १७ ठिकाणांवर छापे टाकले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रांचीमध्ये सात आणि जमशेदपूरमध्ये नऊ ठिकाणी इन्कम टॅक्सचे छापे टाकण्यात येत आहेत. जमशेदपूरच्या अंजनिया इस्पातसह इतर ठिकाणांचाही समावेश आहे. छापेमारीबाबत सविस्तर माहिती येणे बाकी आहे. आयकराची ही कारवाई अशा वेळी झाली आहे, जेव्हा १३ नोव्हेंबरला पहिल्या टप्प्याचे मतदान होणार आहे.



**प्रयागराज :** प्रयागराजमध्ये एका तरूणाने आपली दुचाकी टाकून रूळावर येणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसच्या समोरून पळ काढला. दुचाकी वंदे भारत टेनच्या इंजिनमध्ये अडकून लांबपर्यंत ओढत राहिली. चालकाने प्रसंगावधान राखत एक्स्प्रेसची गती कमी केल्यामुळे सुदैवाने वंदे भारत रूळावरच राहिली. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती.

## मोदींच्या काळात बदल होऊन देशाचा मान वाढला

### डॉ. किरण रिजिजू यांचे मत

**पुणे :** काँग्रेससाठी एक परिवार महत्त्वाचा आहे, पण आमच्यासाठी देश प्रथम आहे. काँग्रेस काळात गरीब देश म्हणून भारताला हिणवले जात होते. मात्र, मोदी यांच्या काळात बदल होऊन देशाचा मान जगात वाढला आहे, असे मत संसदीय कार्यमंत्री डॉ. किरण रिजिजू यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



या वेळी भाजप पश्चिम महाराष्ट्र माध्यम प्रमुख अमोल कविटकर, पुष्कर तुळजापूरकर, हेमंत लेले, निवेदिता एकबोटे, अतुल सावे, मिलिंद कांबळे उपस्थित होते.



## पिनाक रॉकेट विकत घेण्यासाठी आर्मेनियाने आधीच दिली ऑर्डर

# पिनाका खरेदीस फ्रान्सचा रस

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** शस्त्रास्त्रांसाठी एकेकाळी परदेशांवर अवलंबून असलेला भारत आता शस्त्रास्त्रांच्या सर्वात मोठ्या निर्यातदारांपैकी एक असलेल्या फ्रान्सला पिनाका रॉकेट प्रणाली विकणार आहे. फ्रान्स पिनाक रॉकेट प्रणाली खरेदी करण्यास उत्सुक आहे. आत्मनिर्भर भारत मोहिमेचे किंवा संरक्षण क्षेत्रातील मेक इन इंडियाचे यश यापेक्षा चांगले उदाहरण क्वचितच असू शकते. पिनाक हे भारताच्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) विकसित केले आहे. पिनाक रॉकेट प्रणालीला भगवान शिवाच्या धनुष्याचे नाव देण्यात आले आहे.

संरक्षण क्षेत्रात भारत झपाट्याने आत्मनिर्भर होत आहे. भारत पूर्वी ज्या देशांकडून शस्त्रास्त्रे आणि संरक्षण उपकरणे खरेदी करत असे, ते देश आता भारताकडून संरक्षण उपकरणे खरेदी करण्यास उत्सुक आहेत. यापूर्वी भारताने ब्राह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांची फिलिपाइन्सला निर्यात केली आहे. ब्रह्मोस भारत आणि रशियाने संयुक्तपणे विकसित केले आहे. फ्रेंच आर्मीचे ब्रिगेडियर जनरल स्टीफन रिचौ म्हणाले, 'आम्ही पिनाक मल्टी-बॅरल रॉकेट लाँचर सिस्टिमचे मूल्यांकन करत आहोत, कारण आम्हाला पिनाकसारखी यंत्रणा हवी आहे.' फ्रान्सचे वरिष्ठ अधिकारी दोन्ही बाजूंच्या चर्चेसाठी भारतात आले आहेत.

### दोन देशात उच्च तंत्रज्ञानाची देवाण घेवाण !


फ्रेंच अधिकाऱ्याने सांगितले की, दोन्ही देश उच्च तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करत आहेत कारण ते एकत्रितपणे स्कॉर्पीनसारख्या उच्च दर्जाच्या पाणबुड्या तयार करत आहेत. दोन्ही देशांमधील सहकार्य हे व्यावसायिक भागीदारीपेक्षा अधिक आहे. फ्रेंच ब्रिगेडियर जनरल म्हणाले की दोन्ही देश शक्ती सरावांची मालिका आयोजित करत आहेत. दोन्ही देशांमधील घनिष्ठ भागीदारीचे प्रतीक म्हणून दोन्ही देश एकमेकांच्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. पिनाक रॉकेट प्रणाली ७५ किलोमीटरहून अधिक अंतरावरील लक्ष्यांवर मारा करू शकते. भारत आधीच त्याची निर्यात करत आहे. आर्मेनियाने यासाठी ऑर्डर दिली आहे. इतर अनेक देशही यात रस दाखवत आहेत. या वर्षाच्या सुरुवातीला चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांच्या उच्चस्तरीय भेटीदरम्यान फ्रान्सच्या बाजूने या रॉकेट प्रणालीवर चर्चा करण्यात आली होती.

## रश्दी यांच्या वादग्रस्त पुस्तकाच्या आयातीवरील बंदी उठवली!

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने सलमान रश्दी यांच्या द सॅटॅनिक व्हर्सेस या वादग्रस्त पुस्तकाच्या आयातीवर १९८८ साली घातलेली बंदी उठवली आहे. बंदी घालणारी अधिसूचना अधिकारी सादर करू शकत नसल्यामुळे ती अस्तित्वात नाही असे गृहीत धरले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती रेखा पल्ली आणि न्यायमूर्ती सौरभ बॅनर्जी यांच्या खंडपीठाने ५ नोव्हेंबरला हा निर्णय दिला होता.

२०१९ मध्ये संदीपन खान नावाच्या व्यक्तीने पुस्तक आयात करण्यासंदर्भात याचिका दाखल केली होती. संदिपन म्हणाले, त्यांनी द सॅटॅनिक व्हर्सेस' या पुस्तकाची ऑर्डर दिली होती, मात्र ३६ वर्षांपूर्वी सीमा शुल्क विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेमुळे हे पुस्तक आयात करता आले नाही.




तथापि, ही अधिसूचना कोणत्याही अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध नव्हती किंवा त्यासंबंधीची कागदपत्रे कोणत्याही संबंधित अधिकाऱ्याकडे उपलब्ध नव्हती. द सॅटॅनिक व्हर्सेस या पुस्तकाच्या नावावरच मुस्लिम धर्माच्या लोकांनी आक्षेप नोंदवला होता. या पुस्तकात रश्दींनी एक काल्पनिक कथा लिहिली आहे. कथा अशी आहे की, दोन चित्रपट कलाकार विमानाने मुंबईहून लंडनला जात आहेत.

## ट्रंप यांच्या विजयानंतर महिलांची मोहीम

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रंप यांनी विजय मिळवला. हा विजय महिलांच्या रिप्रोडक्टिव्ह हक्कांविरोधातला विजय असेही चित्र निर्माण झाले आहे. त्यातून अमेरिकेतील महिलांनी No Sex, No Dating, No Marriage, No Children अशी मोहीम सुरू केली असून पुरुषांवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले आहे. महिलांची अशी चळवळ सर्वप्रथम दक्षिण कोरियात सुरू झाली होती, याला ४ँ चळवळ असे नाव दिले गेले आहे. ही चळवळ आता अमेरिकेतही सुरू झाली आहे. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप याचा विजय हा पुरुषांचा विजय म्हणून पाहिला जात आहे.

## गुरप्रीत सिंगच्या हत्येमध्ये सामील; गँगस्टर अर्श डल्लाच्या दोन शूटर्सना अटक

वृत्तसंस्था

**चंदीगढ :** कॅनडामध्येस्थित गँगस्टर अर्श डल्लाच्या गँगमधील दोन शूटर्सना पंजाब पोलिस, स्टेट स्पेशल ऑपरेशन सेल आणि अँटी गँगस्टर टास्क फोर्सने केलेल्या संयुक्त कारवाईत अटक केली आहे. अनमोलप्रीत सिंग आणि नवज्योत सिंग असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. अटकेत असलेले दोन्ही शूटर फरीदकोटमधील गुरप्रीत सिंगच्या हत्येमध्येही सामील होते. त्यांनी ग्वाल्हेरमध्ये जसवंत सिंग गिलची हत्या केली होती. कॅनडामध्ये बसलेल्या गँगस्टर अर्श डल्लाच्या सांगण्यावरून या दोन शूटर्सनी ग्वाल्हेरमध्ये जसवंत सिंग गिलचीही हत्या केली होती.



पंजाब पोलिसांच्या डीजीपीने केलेल्या ट्विटमध्ये असे म्हटले आहे की, राज्य स्पेशल ऑपरेशन सेल (एसएसओसी), मोहालीने अँटी गँगस्टर टास्क फोर्स (एजीटीएफ) आणि फरीदकोट पोलिसांच्या संयुक्त कारवाईत दोन शूटर्सना अटक केली आहे. हे दोन्ही शूटर कॅनडास्थित गँगस्टर अर्श दलासाठी काम करतात.

## येशूंचा मुकूट जतन केलेल्या कॅथेड्रलचे पुनरुज्जीवन

### नोत्र दाम कॅथेड्रल झाले होते भस्मसात

वृत्तसंस्था

**पॅरिस :** ख्रिस्ती धर्मांत अत्यंत मानाचे स्थान असलेल्या पॅरिसमधील नोत्र दाम कॅथेड्रलला २०१९ मध्ये भीषण आग लागली होती. पाच वर्षांच्या अथक परिश्रमातून हे कॅथेड्रलचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे. या कॅथेड्रलमध्ये शुक्रवारी प्रतिकात्मक घंटांचा निनाद करण्यात आला. या कॅथेड्रलमध्ये येशू ख्रिस्तांना क्रुसावर चढवताना त्यांच्या डोक्यावर चढवण्यात आलेला काटेरी मुकूट जतन करून ठेवण्यात आलेला होता. आगीची घटना घडल्यानंतर हा काटेरी मुकूट या कॅथेड्रलमधून सुरक्षितरीत्या बाहेर आणण्यात आला होता.



सध्या हा मुकूट पॅरिसच्या लूव्र या संग्रहालयात ठेवण्यात आला आहे. यावरून या कॅथेड्रलचे महत्त्व अधोरेखित होते. आता हे कॅथेड्रल पुन्हा नागरिकांसाठी खुले होत आहे. या कॅथेड्रलमध्ये ८ घंटा आहेत. आगीच्या घटनेनंतर कॅथेड्रल बंद करावे लागले होते. शुक्रवारी या घंटाचा निनाद झाला. ही घटना प्रतिकात्मक म्हणून पाहिली जात आहे. या घंटाचा निनाद सध्या अचूक नसला तरी यावर अधिक काम केले जाईल, असे अलेक्झांडर गौजेन यांनी म्हटले आहे. अलेक्झांडर यांच्याकडे या घंटांची पुनर्स्थापना करण्याची जबाबदारी होती.

## उत्तर कर्नाटकात गळीत हंगाम सुरू; मंत्री शिवानंद पाटील यांची माहिती

वृत्तसंस्था

**बेंगळूर :** उत्तर कर्नाटक भागात चालू वर्षातील गळीत हंगाम एक आठवडा आधीच सुरू करण्यात आला आहे. आदेशानुसार ८ नोव्हेंबरपासून ऊस गाळप सुरू करण्यात आला अशी माहिती वस्त्राद्योग, साखर आणि कृषी बाजारपेठ मंत्री शिवानंद पाटील यांनी दिली. हुबळी येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

बेंगळूरमध्ये ऑगस्ट महिन्यात दक्षिण भारतातील साखर कारखाने संघटनेच्या बैठकीत १५ नोव्हेंबरपासून ऊस गाळप सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मात्र, शेतकऱ्यांचा दबाव आणि साखर कारखान्यांच्या मालकांच्या विनंतीमुळे शुक्रवार ८ नोव्हेंबरपासून गळीत हंगाम सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. दक्षिण कर्नाटक भागात तीन महिन्यापूर्वीच गळीत हंगामाला सुरुवात झाली, असेही ते म्हणाले.

## रक्त चाचणीतूनही डिमेन्शियाचे निदानाचे संधोधन

वृत्तसंस्था

### जर्मनीतील ऱ्हुर विद्यापीठाचे संशोधन

**बर्लिन :** उतारवयात होणाऱ्या मेंदूच्या काही असाध्य विकारांमध्ये डिमेन्शिया, अल्झायमर्स यासारख्या आजारांचा समावेश होतो. शरीरातील अन्य पेशींप्रमाणे चेतापेशी नव्याने निर्माण होऊ शकत नाहीत. त्यामुळे एकदा मेंदूतील अशा पेशींचा ऱ्हास झाला की, त्या जागी नव्या पेशी तयार होऊन मेंदूचे कार्य सुरळीत राहण्याची शक्यता नसते; मात्र असा ऱ्हास रोखण्यासाठी किंवा त्याचा वेग कमी करण्यासाठी वेळीच काही उपाययोजना करता येऊ शकतात. त्यासाठी अशा आजारांचे वेळीच निदान होणेही गरजेचे असते. याबाबत सातत्याने संशोधने होत असतात. रक्त चाचणीतूनही स्मृतिभ्रंश म्हणजेच डिमेन्शियाचे लवकर निदान करण्याची एक पद्धत शोधण्यात आलेली आहे.

या चाचणीमुळे याबाबतच्या नव्या औषधांच्या निर्मितीसाठी चालना मिळण्याची शक्यता असल्याचे जर्मनीतील ऱ्हुर विद्यापीठाच्या संशोधकांनी म्हटले आहे. स्मृतिभ्रंश झालेल्या रुग्णांच्या मेंदूमध्ये



लक्षणांच्या सुरुवातीला अमायलॉइड बिटाचा थर जमा होण्यास सुरुवात होते. रक्ताच्या चाचणीमध्ये इम्युनो इन्फ्रारेड सेन्सर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अमायलॉइड बिटा थराचा आकार आणि त्याची रचना समजून घेतली जाते. या चाचणीमुळे स्मृतिभ्रंश आजाराचे निदान लवकर होत असल्याचे दिसून येते, असे मॉलिक्यूलर सेल नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## पितृसत्ता ही डाव्यांनी निर्माण केलेली संकल्पना

**बंगळुरू :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पितृसत्ताबाबत आपले मत मांडले आहे. त्या म्हणाल्या की, जर पितृसत्ता भारतातील महिलांना त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यापासून रोखत असेल तर इंदिरा गांधी पंतप्रधान कशा होऊ शकतात? त्यांनी शनिवारी सीएमएस बिझनेस स्कूल, बंगळुरू येथे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ही माहिती दिली.

## मेक्सिको ; बारमध्ये अंदाधुंद गोळीबार

### १० जणांचा जागीच तडफडून मृत्यू

वृत्तसंस्था

**मेक्सिको :** मध्य मेक्सिकोतील एका बारमध्ये बंदूकधाऱ्यांनी गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात १० जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत, अशी माहिती स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे. मेक्सिकोतील क्वेरेटारो येथे एका बारमध्ये झालेल्या गोळीबारात किमान १० जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत.

स्थानिक वृत्तानुसार, काही सशस्त्र हल्लेखोरांनी बारमध्ये प्रवेश केला आणि तेथे बसलेल्या लोकांना आणि कर्मचाऱ्यांना लक्ष्य करत गोळीबार सुरू केला.



**प्रयागराज :** उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे जानेवारीमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याच कुंभमेळ्यात पक्षी उत्सवाचाही समावेश केला जाणार आहे. १ आणि २ फेब्रुवारीला हा पक्षी उत्सव साजरा करण्यात येणार असून त्याचा उद्देश जनतेला निसर्गाशी जोडणे हा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. १३ जानेवारीपासून महाकुंभपर्वाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

## उत्तर कोरियन सैनिकांना लागले 'पॉर्न'चे व्यसन !

वृत्तसंस्था

### इंटरनेट सुविधेचा दूरउपयोग

**मॉस्को :** रशियात तैनात उत्तर कोरियाच्या सैनिकांना प्रथमच इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळाली आहे. तेव्हापासून हे सैनिक सतत पॉर्न साइटला भेट देत आहेत. काही सैनिकांना पॉर्न फिल्म पाहण्याचे व्यसनच लागले आहे. अशा परिस्थितीत या जवानांच्या वागणुकीबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. उत्तर कोरियामध्ये इंटरनेटवर कडक नियंत्रण आहे आणि तिथले नागरिक केवळ सरकारी-नियंत्रित कंटेंट पाहू शकतात, परंतु रशियामधील या स्वातंत्र्यामुळे उत्तर कोरियन सैनिकांना रानच मोकळे झाले आहे. माहितीनुसार रशिया आणि उत्तर कोरियात एक तह झाला असून याअंतर्गत उत्तर कोरियाचे दहा हजार सैनिक रशियात युक्रेनविरुद्ध लढण्यासाठी पोहोचले आहेत.

## लडाखमध्ये विस्तारित शस्त्रागाराचा प्रस्ताव

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** संरक्षण मंत्रालय लष्करी ताकद वाढवण्यासाठी लडाखमध्ये अधिक शस्त्रास्त्र-दाऊगोळा साठवण जागा (शस्त्रागार) तयार करण्याची तयारी करत आहे. या शस्त्रागारामुळे या भागात तैनात लष्करी तुकड्यांना परिस्थितीनुरूप दारूगोळा उपलब्ध करण्याचा विचार आहे. विशेषतः चीनच्या सीमेला लागून असलेल्या पूर्व लडाखच्या भागांसाठी ही योजना बनवली जात आहे. या भागात गलवान व्हॅलीचाही समावेश असून तेथे २०२० मध्ये भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये हिंसक संघर्ष झाला होता.

लुकुंग हे पँगाँग त्सो तलावाच्या काठावर वसलेले गाव आहे. याशिवाय दुरबुक भागातही सुरक्षा दलांची उपस्थिती वाढवण्याची योजना आहे. एप्रिल ते जुलै २०२३ दरम्यान पाठवलेले हे प्रस्ताव पर्यावरण मंत्रालयाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. या प्रस्तावांवर पर्यावरण मंत्रालयानी हिरवा कंदील दाखविण्याची आवश्यकता आहे.

### भूमिगत गुहा बांधण्याचीही योजना

याशिवाय इतर मोक्मयाच्या ठिकाणी भूमिगत गुहा बांधण्याचीही योजना आहे. याच भागात सध्या लष्करी तुकड्या तैनात आहेत. विशेषतः पूर्व लडाखमधील हानले, पुंगुक, फोटी ला आणि कोयुल सारख्या फॉरवर्ड भागात ही निर्मिती केली जाणार आहे. सध्या येथे बहुतांश दारूगोळा तात्पुरत्या स्वरूपात साठवला जातो. हा शस्त्रसाठा हानलेपासून सुमारे २५० किलोमीटर आणि फोटी लापासून सुमारे

### पर्यावरण मंत्रालयाच्या मंजुरीची प्रतीक्षा



## मधमाशांच्या हल्ल्यात चार जण अत्यवस्थ

**वेंगुर्ला :** बेळगाव-वेंगुर्ला मार्गावरील उचगाव फाट्यावर मधमाशांनी या मार्गावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांवर हल्ला केल्याने चार जण अत्यवस्थ व आठ जण जखमी झाल्याची घटना शनिवारी सकाळी नऊच्या सुमारास घडली.

या घटनेची माहिती सर्वत्र पसरल्याने काहीकाळ या परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.

# अध्यात्मातून जिवन जगण्याचा मार्ग सापडतो

**अध्यात्मिक** कडा येथे जयंती महोत्सव उत्साहात

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

जैन साध्वी विश्वदर्शनाजी म सा यांच्या ५० व्या दीक्षा जयंतीनिमित्त कडा येथे सोमवारी जयंती महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन आले होते. यावेळी जैन श्रावक संघाच्या वतीने त्यांना आगम ज्योती या पदवीने अलंकृत करण्यात आले.

कडा येथील जैन स्थानकामध्ये जैन साध्वी विश्वदर्शनाजी म सा आणि कीर्तीसुधाजी म सा यांच्या उपस्थितीमध्ये चातुर्मास सुरू आहे . यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले गेले . सोमवारी ( दिनांक ११ नोव्हेंबर) विश्वदर्शनाजी म सा यांच्या ५० व्या दीक्षा जयंती निमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला महावीर भवन क्षेत्र शुद्धी जप मांगलिक करण्यात आली . त्याच प्रमाणे कुंदनऋषिजी म सा यांचा जन्मदिवस साजरा करण्यात आला . कडा येथील श्रीराम मंदिरात मुख्य कार्यक्रम पार पडला. विश्र्वदर्शनाजी म सा यांनी दीक्षा घेण्याआधी आणि दीक्षा घेतल्यानंतरचा आपला जीवन प्रवास सांगितला . आपले गुरू प्रमोद सुधाजी म सा यांचे ऋण व्यक्त केले. त्यांच्या सहकारी कीर्तीसुधाजी म सा यांनी विश्वदर्शनाजी म सा यांच्या सानिध्यातील अनुभव सांगितले. दर्शित गादिया यांच्या सुश्राव्य गीत संगीताने कार्यक्रमाची शोभा वाढवली . विश्र्वदर्षनाजी म सा यांना यावेळी जैन श्रवक संघाच्या वतीने आगम ज्योती पदवीने अलंकृत करण्यात आले . बाबुसेठ भंडारी हे महाप्रसादाचे यजमान होते . यावेळी कडा , आष्टीसह परिसरातील जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कडा येथे महावीर भवन उभारण्यासाठी उपस्थितांनी आपापले योगदान देण्याची भावना व्यक्त केली .




# महावितरणचा भोंगळ कारभार!

## दुर्लक्षित: नागरिकांना अडचणींचा सामना



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

सहा महिन्यापासून आश्वासन देऊनही विजेचे खांब रस्त्यातून हाटले नाहीत आणि दोन महिन्यापासून ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होऊन ही नवीन ट्रान्सफॉर्मर आलाच नाही. बीड येथील महावितरण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सर्वांनाच अडचणीचा सामना करावा लागत आहे

आष्टी साबलखेड रस्त्यावर कडा येथील रस्त्याच्या कामात टाकळी गावाकडे जाणारे विद्युत पोल अडथळा आणत आहेत . यासाठी कडा येथे रास्ता रोको करण्यात आला होता . पंधरा दिवसात हे विद्युत खांब महावितरण अधिकाऱ्यांनी आश्वासन देऊनही सहा महिने झाले तरी हटलेले नाहीत. त्यामुळे रस्त्याच्या एका बाजूचे काम अर्धवट राहिलेले आहे त्यामुळे वाहतुकीलाही मोठा अडथळा पान २ वर...

# सामाजिक बंधिलकीतून राबविले रक्तदान!

## उपक्रम: रक्तपेढीत रक्तदान शिबिर

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

रक्तपेढी मध्ये रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुडवडा भासू लागल्याने रक्तपेढीनी केलेल्या आवाहनाची दखल घेत क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था आमखेडा व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने दि.११ सोमवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास उत्तम प्रतिसाद मिळत सत्तावीस रक्तदात्यांनी रक्तदान केले. दरम्यान सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष दिलीप शिंदे,जेष्ठ पत्रकार विजय पगारे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर रक्तदान संकलनास सुरुवात करण्यात आली.

रक्ताची गरज लक्षात घेता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गरजूंना वेळेत रक्त उपलब्ध व्हावे, रक्ता अभावी कोणाचा मृत्यू होऊ नये या अनुषंगाने क्रांती जनहित बहुउद्देशिय विकास संस्था आमखेडा व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना सोयगाव यांच्या मार्फत व रेड प्लस रक्तपेढी जळगाव (खान्देश) यांच्या सहकार्याने सोयगाव येथील बसस्थानक मागे रक्तदान शिबिर आयोजित केले होते.या रक्तदान शिबिरात सत्तावीस रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान संकलन करण्याचे काम रेड प्लस पतपेढीचे डॉ.रवींद्र पाटील, दीपक पाटील, शाहिद शेख,रोशन तितरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे पान २ वर...




# सासरच्या लोकांनी जगणे मुस्कील केले!

## कारवाई: केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील कानडीमाळी येथील एका महीलेचा सासरच्या लोकांन कडुन सुनेचा छळ केला जात या प्रकरणी केज पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे या विषयी सविस्तर वृत्त असे की महीलेचा व्यवसाय घरकाम रा. कानडीमाळी ता. केज ह. पु. वसंत कॉलेज जवळ, केज ता. केज जि. बीड जात माळी महीलेने समक्ष पोलीस स्टेशन केज येथे हजर राहुन तोंडी सांगुन फिर्याद दिली आहे,व फिर्यादी महीले असे म्हटले आहे की वरील ठिकाणची रहिवाशी असुन माझे लग्न दिनांक २९/०४/२०१३ रोजी भागवत रामभाउ राउत रा. कानडीमाळी ता. केज जि. बीड यांचे सोबत बनसारोळा ता. केज जि. बीड येथे येथे माझे आई–वडीलांनी हिंदु रितीरिवाजाप्रमाणे संसार उपयोगी साहित्य व मान पान देवुन लग्न करून दिले होते. लग्न झाल्यानंतर सात वर्षे सासरी कानाडीमाळी येथे राहिले. पती भागवत यांचेपासून मला एक मुलगा रुद्र वय ११ वर्षे व एक मुलगी स्नेहल वय ०८ वर्षे असे आहेत. गेल्या पाच वर्षापुर्वी सण. २०२० पासुन मी माझे पती, मुलाबाळांसह व सासु कमलबाई रामभाउ राउत यांचेसह वसंत कॉलेज जवळ, केज येथे स्वतहाच्या घरी राहण्यास आहोत. केज येथे राहण्यास आल्यापासुन सण. २०२० पासुन माझे पती भागवत रामभाउ राउत रा. कानडीमाळी ता. केज जि. बीड व सासु कमलबाई रामभाउ राउत हे दोघेजन मला किरकोळ कारणावरुन तसेच मी माहेरीच्या लोकांना पैसे देते, असा आरोप घेवुन शिवीगाळ करत होते. त्यानंतर काही माझे पती भागवत व सासु कमलबाई हे मला म्हणु लागले की, केज येथील घराचे कर्ज फेडण्यासाठी तु तुझे आई–वडीलांकडून पाच लाख रुपये घेवुन ये असे वारंवार म्हणुन तगदा लावत होते परंतु माझे आई–वडीलांची परिस्थीती गरीब असल्याने मी आई–वडीलांना सदरचा प्रकार न सांगता त्यांचा त्रास सहन करत होते. ननंदा महानंदा अनुरथ गोरे रा. बनसारोळा व शिवनंदा केखा राउत रा. कानडीमाळी यापण सनावाराला आल्यानंतर पाच लाख रुपये घेवुन येण्यासाठी मला शिवीगाळ करायच्या व तु जर आमच्या भावाला पैसे आणून दिले नाहीस तर आम्ही तुझे नांदने मोडुन पान २ वर...




# अनिलदादा जगताप यांना पाठिंबा!

## भिमराव कोकाटे:विजयासाठी जीवाचे रान करु



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या रनधूमाळीत बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांच्याकडे दरदिवशी जाहीर प्रवेश होत आहेत तर अनेक मातब्बर व्यक्ती आणि संघटन अनिलदादांना पाठिंबा देत आहेत. काल दि. ११ नोव्हेंबर रोजी सायं ६.०० वाजताच्या दरम्यान बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना मराठा संग्राम पक्ष महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जाहिर पाठींबा देण्यात आला आहे.

बीड विधानसभा मतदार संघात गेली अनेक वर्षापासून सामाजिक चळवळ असो, या राजकीय क्षेत्र असो या मतदार संघात अनिलदादा यांनी समाजसेवक म्हणून खुप मोठ्या प्रमाणात योगदान राहिलेले आहे. जन सामान्याच्या हितासाठी अनिलदादा यांनी कायम प्राधान्याने पुढाकार घेऊन त्यांच्या समस्या अडचणी सोडवल्या आहेत म्हणुन संपुर्ण बीड विधानसभा मतदार संघात लोकप्रिय अपक्ष उमेदवार सन्माननिय अनिलदादा जगताप यांच्या पाठीशी खंभीरपणे उभे असल्याचे पान २ वर...

# सर्वांगीण विकासासाठी बदल हवा

## राजेसाहेब देशमुख :परळी तालुक्यात संवाद दौरा

अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मतदानरुपी आशीर्वाद देऊन मला मतदार मायबाप जनतेने सेवा करण्याची संधी द्यावी. परळीच्या सर्वांगीण विकासासाठी आता बदल करण्याची वेळ आली आहे. आपण ज्यांना २०१९ च्या निवडणुकीत आमदार म्हणून निवडून दिले त्यांनी या भागाचा विकास करणे ऐवजी आपल्या बगलबच्याचा व स्वत: चा विकास मात्र केला आहे. शेतकऱ्यांना पिक विमा, अनुदान, अग्रीम का मिळाले नाही? मतदारांनी निष्क्रिय कृषी मंत्र्याला जाब विचारला पाहिजे असे आवाहन महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजसाहेब देशमुख यांनी मतदारांशी संवाद साधताना केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना महाविकास आघाडी २३३ परळी विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब श्रीकिशन देशमुख यांच्या प्रचारार्थ मौजे, नवाबवाडी, मुरंबी, घोलपवाडी, खजेवाडी, लिमगाव तांडा, चोथेवाडी येथे मतदार संवाद कार्यक्रम पार पडला. यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते ऍड. माधव आप्पा जाधव, शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट, महाविकास आघाडीतील विविध घटक पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, गावातील जेष्ठ नागरिक, युवक मतदार बंधू –भगिनी पान २ वर...



# स्नेहसदन चर्च येथे यात्रा महोत्सव

## अध्यात्मिक: भाविकांचा उस्फूर्त प्रतिसाद



राहुरी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

स्नेह सदन चर्च येथे २९वा मतमाऊली यात्रा उत्सव मोठ्या उत्साहाने व भक्ती भावाने साजरा करण्यात आला नाशिक येथील बिशप स्वामी लुडस डॉनियल यांनी प्रवचन केले

यात्रेनिमित्त तीन दिवस नोव्हेना ठेवण्यात आली होती यात्रे निमित्ताने मतमाऊली पुतळ्याची भव्य मिरवणूक काढण्यात आली वांबोरी चर्च येथील भाविकांनी दिलेल्या पालखीतून मिरवणूक काढण्यात आली होती ती विशेष आकर्षण ठरली या यात्रा महोत्सवाला फा जेम्स थोरात फा रणवरे फा सुभाष त्रिभुवन फा प्रकाश राऊत फा मोटीलाल फा पान २ वर...

**अभिनंदनिय** डॉ.रेणुका फुटके महाराष्ट्रात प्रथम

# माझ्या लेकीने नाव कमावले!



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील शास्त्रीनगर भागातील रहिवासी भिमाशंकर फुटके यांची कन्या डॉ रेणुका भीमाशंकर फुटके महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए मध्ये ओबीसीतून महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावत परळीचा शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

### भिमाशंकर फुटके यांच्या चारही मुली उच्च शिक्षीत

श्री. फुटके यानी आपल्या चारही मुलींना उच्चशिक्षण दिले आहे. सोनम शिक्षीका, मिनाक्षी आयआयटी मधून पिएचडीकरुन बेंगलोर येथे नौकरी करत आहे, मेघा कॅनरा बँकेत अँग्रीकल्चर ऑफीसर, डॉ. रेणूका एमबीबीएस डॉक्टर नंतर आता मेडिकल ऑफीसर बनली आहे.

शहरातील शास्त्रीनगर भागातील सेवानिवृत्त शिक्षक भिमाशंकर फुटके व आशा फुटके यांची कन्या डॉ रेणुका भीमाशंकर फुटके महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए मध्ये ओबीसीतून महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. डॉ रेणुचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शहरातील न्यु हायस्कूल मध्ये तर उच्च माध्यमिक शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर तर वैद्यकीय शिक्षण मुंबई येथील लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालयात पूर्ण झाले. यानंतर डॉ रेणुकाने मुंबई येथे प्रॅक्टीस करत २०२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या इन्सुरंस मेडिकल ऑफीसर ग्रुप ए ची परिक्षा दिली होती. यापरिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परिक्षेत ओबीसी वर्गातून महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# संवेदनशील गावांमध्ये पथसंचलन

## अलर्ट: कायदा,सुव्यवस्थेसाठी रुटमार्च



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने, मतदान केंद्रातील गावांमध्ये गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल, केरळ येथील पोलिसांच्या वतीने गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गावामधून पोलिसांनी व जवानांनी सशस्त्रासह पथसंचलन केले.

गेवराई पोलीस ठाण्याअंतर्गत असणारे संवेदनशील मतदान केंद्र मिरकाळा व मुळुकवाडी या गावांमध्ये दिनांक ११ नोव्हेंबर सोमवार रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास पथसंचलन करण्यात आले, मिरकाळा गावातील गल्लीबोळामध्ये सुरुवात करून गावाला वेढा देऊन पोलिसांनी पथसंचलन पूर्ण करून संवेदनशील असलेल्या मुळकवाडी या गावांमध्ये जाऊन मतदान केंद्राच्या पान २ वर...